**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**सर्व साधारण सभा**

गुरुवार दि. ४.६.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफि अहेमद | कदम गंगाबाई नारायणराव |
| सातोलीकर श्रीनिवास आशन्ना | पवळे उमेश देवराव |
| कोकाटे नागाबाई भुजंगराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| बियाणी प्रविण बालाप्रसाद | चव्हाण आनंद शंकरराव |
| फारुख अली खा इलियाज खॉ | अंजुम बेगम शेख अफरोज |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | आनेवार गंगासागर संदीप |
| भवरे किशोर दामोधर | कदम शीला सुनिल |
| कनकदंडें मोहिनी महेशराव | वाजेदा तबसुम अथर अली खॉ |
| स.जानी म.कासीम | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश | जाधव जयश्री आनंद |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ |
| मुदिराज कमलाबाई रामस्वामी | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| रजियाबेगम अयुबखान | गाडगे शंकर जयवंतराव |
| देशमूख वैशाली मिलिंद | गायकवाड अंजली सुरेशराव |
| स.इतरत फातेम स.मजहुर हुसेन | गफारखान गुलाम महमंद खान |
| अनुजा अमितसिंह तेहरा | शर्मा पुष्पाताई राजेश |
| नवाब गुरुमितसिंघ ब-यामसिंघ | गिल सरजितसिंध पंजाबसिंघ |
| अ.हबीब अ.रहिम बागवान | बिपाशा बेगम स.वलीयोध्दीन |
| अ.सत्तार अ.गफुर | स.शेर अली स.महेबुब अली |
| इशरत फातेमा अ.शमीम | कुरेशी चॉदपाशा खाजा |
| तहसीन बेगम अ.समद | फारुख हुसेन कासिम साब |
| राखेवार सतिष शेषप्पा | अ.लतिफ अ.मजीद |
| जकिया बेगम स.मुखतार | बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला |
| लतिफा बेगम बु-हानखान | रावत दिपकसिंह काशिनाथसिंह |
| किशोर यादव | सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधरराव |
| अभिषेक सौदे | काकडे सिंधू पांडूरंग |
| देशमूख मंगला गजानन | चिखलीकर संदिप सुभाषराव |
| प्रा.ललिता मुकूंदराव बोकारे | विनय विश्वांभरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजी |
| येवनकर विजय हिरांचद | कदम विश्वास बालाजी |
| अड.बन शाम वामनराव | अल केसरी हसन बिन उमेद |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर **सौ.शैलजा किशोर स्वामी**, या होत्या. तसेच श्री सुशील खोडवेकर, आयुक्त, श्री प्रमोद येवले, उपआयुक्त, (प्रशासन), डॉ.असिफ, प्र. मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी,श्री आर.एस.कोलगणे, श्री विजय मुंढे, स.आयुक्त आरोग्य, , श्री अंधारे, अभियंता बिएसयु पी,श्री गिरीष कदम,का.अभियंता सा.बा.वि. व महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले

**सरजितसिंघ गिल** नेपाल मध्ये भूकंप होवून घरे पडल्यामूळे हजारो नेपाली नागरीक मृत पावले त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**गफार खान** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** भुकंपाचे तिवृ धक्याने नेपाल मध्ये घरे पडून हजारो नांगरीकांचा मृत्यू झाला त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

**ठराव क्र. १** **ठराव**

नुकतेच नेपाल देशात भुकंपाचे तिवृ धक्याने अनेक घरे पडून त्यात हजारो नागरीकांचा मृत्यू झाला त्यांना ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

**रामनारायणजी काबरा** महापौर पदावर सौ.शैलजा किशोर स्वामी यांची तसेच उपमहापौर पदी श्री कुरेशी शफी अहेमद यांची निवड झाल्याबध्ल पहिल्या सभेत मी त्यांचे अभिनंदन करतो. अनेक दिवसापासून माईक व्यवस्था बंद पडलेली असल्यामूळे स.सदस्यांना विषय पत्रिकेवरील विषयावर आपले मत मांडता येत नाही सभेच्या कामकाजात भाग घेता येत नाही. माईकची व्यवस्था चालू होणार आहे किंवा नाही,यास जे अधिकारी जबाबदार असतील त्यांना नोटीस देवून त्यांचेकडून खुलासा मागविण्यात यावा. माईक व्यवस्था नसल्यामूळे स.सदस्यांना बोलण्याची संधी मिळत नाही. पुढच्या सभेत माईकची व्यवस्था करण्यात यावी.

**महापौर** माझी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर पदी निवड केल्याबदल मी सर्व प्रथम महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस कमीटीचे अध्यक्ष मा.खा.श्री अशोकरावजी चव्हाण साहेब व मा.आ.सौ.अमिता चव्हाण (भाभीजी) यांचे मनपुर्वक आभार मानते व ऋण व्यक्त करते. आज माझ्या अध्यक्षतेखाली दि.४ जून २०१५ रोजी प्रथम सर्वसाधारण सभा होत आहे. माझ्या या पहिल्या सर्वसाधारण सभेत सर्व पदाधिकारी.सर्व गटनेते,सर्व स.सदस्य/सदस्या अधिकारी वर्ग या सर्वाचे मी स्वागत करते.

प्रथम शहरातील नागरीकांना प्राथमिक मुलभूत सोई सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेचे आद्यकर्तव्य आहे. नागरीकांना मुलभूत सोई सुविधा प्राप्त व्हाव्यात यासाठी मी प्रामुख्याने खालील गोष्टीवर भर देवू इच्छिते.

१) स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनात सुधारणा करणे.
२) शैक्षणिक क्षेत्रामध्ये महानगरपालिकेच्या शाळेमध्ये शैक्षणिक स्तर व विद्यार्थ्याचे दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी प्रयत्न करणे.
३) आरोग्य क्षेत्रामध्ये रुग्णासाठी खास करुन करुन महिलांसाठी आणखी जास्त सुविधामध्ये वाढ करणे
४) महिलांसाठी रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करणार
५) शहरात प्लॉस्टीक कॅरीबॅक मुक्तीसाठी जन जागरण करणेसाठी प्रयत्न असेल.
६) शाहु महाराज,महात्मा बसवेश्वर ,भगवान गौतम बुध्द,महात्मा फुले,सावित्रीबाई फुले,कै. वसंतराव नाईक यांचे पुतळे उभारण्यासाठी प्रयत्न राहिल.
७) सर्व स.सदस्य/सदस्या यांचे प्रभागातील समस्या सोडविण्यासाठी जास्तीत जास्त वेळ देणार असून विशेषतः त्यांच्या कामांना प्राधान्य देईल.
८) नांदेड शहर स्मार्ट सिटीमध्ये समावेश होण्याच्या मार्गावर असून नविन तंत्रज्ञानाचा वापर करुन महानगरपालिकेच्या सर्व कामांसंदर्भात माहिती उपलब्ध्द होवू शकेल. व नागरीकांना ती माहिती अवगत करता येइल. या उध्देशाने सर्व स. सदस्य व सदस्यांना आजच्या सभेत लॅपटॉप देण्यात येत आहे
   नगरोत्थान योजने मध्ये शहरातील रस्त्याचे अर्धवट अवस्थेत राहिलेले कामे चालू करण्यात आले आहेत.देगलुर नाक्याचे मुख्य रस्त्याचे कामे पावसाळा सुरु होण्यापुर्वी पुर्ण करण्याचा प्रयत राहिल.
९) सर्वसाधारण सभेतील ठराव झालेले व इतर कामांचा पाठपुरावा होण्यासाठी उपआयुक्तांची नेमणूक करणार व प्रत्येक सर्वसाधारण सभेपुर्वी उपआयुक्तांनी स.सदस्यांना झालले कामाचे अहवाल द्यावा.
१०) स.सदस्याने स्वेच्छा निधी व अंदाजपत्रकातील तरतूदीनूसार प्राधान्य देण्यात येतील.
११) नांदेड शहरातील नागरीकांच्या सेवेत फिरते रुग्णालय (मोबाईल व्हॅन) चालू करण्यात येईल.
१२) सिडको मुख्य रस्त्याचे काम लवकर करण्यासाठी प्रशासनास सुचित केलेले आहे.
१३) मलनिस्सारणाचे कामे सिडको व तरोड खु व बु.मध्ये चालू असल्यामूळे रस्ते खराब झाले आहेत ते पावसाळयापुर्वी दुरुस्तकरुन घेण्याचे सुचित केले आहे.

तसेच मा.आमदार महानगरपालिकेचे स.सदस्य/सदस्या ,आयुक्त श्री सुशिल खोडवेकर व सर्व अधिकारी ,कर्मचारी यांचे सहयोग घेवून चांगले काम करण्याचा प्रयत्न राहिल. स.सदस्य व आयुक्त यांना सोबत घेवून शहर सुंदर व स्वच्छ ठेवण्याची दक्षता घेवू व शहरातील नागरीकांना चांगल्या प्रकारच्या मुलभूत सुविधा उपलब्ध्द करुन देण्याचा प्रयत्न करु. या ठिकाणी उपस्थित पत्रकार बांधवाचे आभार व्यक्त करुन सहकार्य करण्याची विंनती करते आणि मा.खा.श्री अशोकरावजी चव्हाण साहेब ,सर्व

स.सदस्य/सदस्या यांचे आभार व्यक्त करते .प्रभाग क्र.२ मधून माझे मतदारांनी मला मतदान करुन सेवा करण्याची संधी दिली त्याबदल त्यांचेही मी आभार व्यक्त करते. धन्यवाद.

**उपमहापौर** सर्व स.सदस्य/सदस्या यांनी सौ.शैलजा किशोर स्वामी यांची महापौर पदी व माझी उपमहापौर पदी निवड करुन शहरातील जनतेची सेवा करण्याची संधी उपलब्धकरुन दिली त्याबध्दल मी आपले आभार मानतो. महापौरांनी शहरातील विकास कामाच्या शहरातील नागरीकांना चांगल्या मुलभूत नागरी सुविधा देण्याच्या ज्या घोषणा केल्या त्या पुर्ण करण्यासाठी आपणाकडून सर्व प्रकारचे सहकार्य योगदान मिळेल अशी मी आपणाकडून अपेक्षा व्यक्त करतो. तसेच आनंदाची बाब आहे की शासनाच्या आरक्षण धोरणानुसार महिलाला महापौर पद मिळालेले आहे. आपण महिला महापौरांचा आपण मान सन्मान ठेवाल, या सभागृत कोणीही असांसदीय भाषा वापरणार नाही अशी मी आपणाकडून अपेक्षा बाळगतो. सर्व स.सदस्यांना आपले विचार मांडण्याची संधी देण्यात येईल व आपणा सर्वाना बरोबर घेवून सभागृहाचे कामकाज करण्यात येईल अशी ग्वाही मी आपणास महापौराचे वतीने देतो.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** नुकतीच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे महापौरपदी सौ.शैलजा किशोर स्वामी व उपमहापौर पदी श्री कुरेशी शफी अहेमद याची निवड झाल्याबध्दल त्याचे मी अभिंनदन करतो. माजी महापौर श्री अ.सत्तार अ.गफुर, माजी उपमहापौर श्री आनंद चव्हाण, माजी विरोधी पक्षनेता श्री दिपकसिंह रावत याचा मागील अडीच वर्षाचा कार्यकाळ हा अत्यंत चांगल्या प्रकारे गेलेला आहे. त्यांनी महानगरपालिकेचे कामकाज करीत असतांना सर्व स. सदस्याना, प्रशासनास विश्वासात घेवूनच शहर विकासाची काम केलेली आहेत त्याबध्दल मी त्याचे अभिनंदन करतो. नवनियुक्त महापौर सौ.शैलजा किशोर स्वामी ,उपमहापौर श्री कुरेशी शफि अहेमद, हेही सर्व स.सदस्यांना, प्रशासनासविश्वासात घेवूनच महानगरपालिकेचे कामकाज करतील अशी मी त्यांचेकडून अपेक्षा व्यक्त करतो व त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा देतो. तसेच विरोधी पक्षनेते पदी श्री बालाजी देविदासरावजी कल्याणकर यांची विरोधी नेते पदी निवड झाल्याबध्दल त्यांचे मी अभिनंदन करतो.

**स.शेर अली** सौ.शैलजा किशोर स्वामी याची महापौर पदी व श्री शफी अहेमद कुरेशी यांची उपमहापौर पदी निवड झाल्याबध्दल एमआयएम संविधान युतीच्या वतीने मी त्यांचे अभिनंदन करतो. शहर विकासा कामासाठी एमआयएम-संविधान युतीचे त्यांना सर्व सहाकार्य राहील असे आश्वासन देतो. आणि आमचे प्रभागातील विकास कामासाठी ते आम्हाला पुर्ण सहकार्य करतील अशी मी त्याचेकडून अपेक्षा व्यक्त करतो. या महिण्यात मुस्लीमांचा रमजान हा पवित्र महिणा सुरु होत त्यानिमित्य मस्जीदला जाणा-या सर्व रत्यांची दुरुस्ती करण्यात यावी. लाईटची व्यवस्था,साफसफाई ई .व्यवस्था करण्यात यावी.जून्या नांदेड भागात वारंवार जळीत प्रकरणे घडत असून अग्नीशमन वाहने पोहचण्यास उशिर लागत असल्याने जिवीत हानी होत आहे म्हणून जून्या नांदेड शहराकरीता शक्तीनगर /अबचलनगर भागात एक अग्नीशमन केंद्र सुरु करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली असल्यामूळे लवकरात लकवर अग्नीशमन केंद्र सुरु करण्यात यावे.आयुक्तांनी हैदरबाग येथील दवाखाना इमारतीत दवाखाना सुरु करण्याचे आश्वासन दिलेले असून लवकरात लकवर दवाखाना सुरु करण्यात यावा.

**सरजितसिंघ गिल** नविन महापौर, सौ.शैलाजा स्वामी उपमहापौर श्री शफी अहेमद कुरेशी यांच्या पहिल्या सभेत त्याचे अभिनंदन करतो. माजी महापौर श्री अ.सत्तार अ.गफुर व श्री आनंद चव्हाण,माजी विरोधी पक्ष नेते श्री दिपकसिंह रावत यांचा मागील अडीच वर्षाचा कार्यकाळ खुपच खेळीमेळीच्या वातावरणात गेला त्यांनी ज्या प्रमाणे सर्वाना सोबत घेवून महानगरपालिका चालविली त्याच प्रमाणे अडीच वर्ष नविन महापौर व उपमहापौर हे चालवितील व शहरातील विकासाची कामे करतील अशी अपेक्षा व्यक्त करुन त्यांना भावी काळासाठी शुभेच्छा देतो.

**अ.सत्तार अ.गफुर** सर्व प्रथम महापौरपदी विराजमान झालेल्या सौ.शैलजा स्वामी, उपमहापौर श्री शफि अहेमद कुरेशी यांचे मी अभिनंदन करतो.मराठवाडयाचे शिल्पकार माजी मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री डॉ.कै.शंकररावजी चव्हाण हे तत्कालिन नांदेड नगरपालिकेचे आताच्या महानरपालिकेचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष होते अशा महानरपालिकेच्या महापौर पदी स.सदस्यांनी माझी महापौर पदी निवड करुन मला नांदेडवासीयाची सेवा करण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबध्दल मी माजी मुख्यमंत्री मा.खा.श्री अशोकरावजी चव्हाण साहेबाचे, आ.श्री डी.पी.सावंत, माजी आमदार श्री ओमप्रकशजी पोकर्णा, व सर्व स.सदस्यांचे आभार व्यक्त करतो. तसेच सभागृहनेते श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले,विरोधी पक्षनेते श्री दिपकसिंह रावत, स्थायी समितीचे माजी सभापती श्री गणपत धबाळे,श्री उमेश पवळे, आताचे सभापती श्री विनय गिरडे पाटील, महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त श्री जी श्रीकांत, श्री निशीकांत देशपांडे, आयुक्त श्री सुशिल खोडवेकर यांचे शहर विकासा कामासाठी खुप सहकार्य केले त्याबध्दल या सर्वाचे अभार मानतो.केंद्र शासनाने श्री गुरु

गोविंदसिंघजी यांच्या गुरु ता गध्दी कार्यक्रमाकरीता नांदेड शहराचा जेएनएनयुआरएम योजनेत समावेश करुन रु.२०००/- कोटी रुपयाचा निधी मंजूर केला त्यामूळेच आज नांदेड शहराचा चेहरा मोहरा बदलला आहे .या करीता तत्कालिन मुख्यमंत्री कै.विलासरावजी देशमूख , खा.श्री अशोकरावजी चव्हाण, माजी आमदार श्री ओमप्रकाशजी पोकर्णा तत्कालिन जिल्हाधिकारी श्री राधेशामजी मोपलवार यांचेही खुप मोठे योगदान राहिलेले आहे त्याबध्दल त्यांचे ही आभार व्यक्त करतो. या सभागृहाने सौ.शैलजा किशोर स्वामी याची निवड केलेली आहे. त्यांना शहर विकासाचे कामासाठी आमचे पुर्ण सहकार्य राहील.श्री सुशिल खोडवेकर यांनी तीन महिण्यापुर्वीच आयुक्त पदाचा पदभार सांभाळला असून ते अत्यंत चांगल्या प्रकारे महानगरालिकेचे काम करीत आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविल्याशिवाय महानगरपालिका चालू शकत नाही याची आम्हास कल्पणा आहे. मागील २५ वर्षापासून मी या सभागृहाचा सदस्य म्हणून काम करतो यापुर्वीही महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असतांना महानगरपालिका चालविली आहे. मागील सर्वाच्या सहकार्याने मागील वर्षी रेडीरेकनर प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी केल्यामूळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भरीव अशी वाढ झालेली आहे. म्हणून शासनाचे महागनरपालिकेस जवळपास १७ कोटीचे विशेष अनुदान दिलेले आहे. महापौ सौ.शैलजा किशोर स्वामी व उपमहापौर श्री शफि अहेमद कुरेशी हे सर्व सदस्यांना आयुक्ताना विश्वासात घेवून काम करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करुन त्यांना भावी काळासाठी शुभेच्छा देतो .

**आनंद चव्हाण** नविन महापौर सौ.शैलजा किशोर स्वामी व उपमहापौर श्री शफि अहेमद कुरेशी यांना हार्दीक शुभेच्छा देवून शहर विकास कामासाठी त्यांना आमचे पुर्ण सहकार्य राहील असे मी आश्वासन देतो. मागील अडीच वर्षाच्या काळात सभागृह नेते श्री विरेंद्रसिंध गाडीवाले, विरोधी पक्ष नेते श्री दिपकसिंहजी रावत,सर्व .सदस्यांनी आम्हाला खुप चांगले सहकार्य केले त्याबध्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. तसेच माजी आयुक्त श्री जी श्रीकांत,श्री निशीकांत देशपांडे,आताचे आयुक्त श्री सुशिल खोडवेकर यांचेही आम्हाला खुप चांगले सहकार्य मिळाले त्याबध्दल मी त्यांचेही आभार मानतो. केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजने मध्ये नांदेड शहराचा समावेश होत आहे यासाठी आयुक्त श्री सुशिल खोडवेकर यासाठी खुप प्रयत्न केले त्याबध्दल त्यांचेही मी अभिनंदन करतो.

**दिपकसिंह रावत** महापौर पदी सौ.शैलजा किशोर स्वामी व उपमहापौर पदी श्री शफी अहेमद कुरेशी यांची निवड झाल्याबध्दल त्याचे अभिनंदन करुन त्यांना भावी काळासाठी शुभेच्छा देतो. मागील अडीच वर्षाच्या काळात माजी महापौर श्री अ.सत्तार,माजी उपमहापौर श्री आंनद चव्हाण सभागृह नेते श्री विरेंदसिंघ गाडीवाले यांनी सर्वाना विश्वासात धेवून श्हार विकासाची चांगली कामे केली आम्ही विरोधी पक्षाचे असलो तरी शहर विकासाचे चांगल्या कामासाठी त्यांना पुर्ण सहकार्य केलेले आहे. वेळ प्रसंगी विकासाची कामे करण्यासाठी सभागृहाचा मान ठेवून प्रशासनास धारेवरही धरलेले आहे. यापुढेही विद्यमान महापौरांना विकास कामासाठी आमचे सहकार्य राहणारच आहे.महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारुन शहरातील विकास कामे व्हावीत या उध्देशाने रेडीरेकनर प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी करण्यासाठी विरोधीपक्षाच्या सदस्यानी सहकार्य करुन या प्रस्तावास एकमताने मान्यता दिली.रेडीरेकनर प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी केल्यामूळे शासनाने विशेष बाब म्हणून महानगरपालिकेस १७ कोटीचा निधी मंजुर केलेला आहे.नियमानुसार या निधीतून शहरातील विकासाची कामे करण्यासाठी सभागृहाची मान्यता घेण्यात यावी प्रशासनाने परस्पर या निधीचा विनियोग करु नये. शासनाकडून विविध योजने अंतर्गत निधी प्राप्त होतो तो निधीही सर्वसाधाररण सभेची मान्यता घेवूनच खर्च करण्यात यावा. महापौरानी ही सर्वाना विश्वासात धेवून विकासाची कामे करावीत.स्मार्ट सिटी मध्ये नादेड शहराचा समावेश होत आहे ही आनंदाची बाब आहे परंतु गुरुव्दारा लंगर साहिबचे बाबा बलविंदरसिंघजी व बाबा नरींदरसिंघजी हे मागील १० वर्षापासून शहरात वृक्षारोपन करुन नांदेड ग्रीनसिटीची योजना राबवित आहेत परंतु या ग्रीनसिटी प्रकल्पास महागनरपालिकेने आज पर्यत कोणतीही मदत केलेली नाही सभागृहास विनंती आहे की,या ग्रीनसिटी प्रकल्पास महानगरपालिकेने हातभार लावून आवश्यक ती मदत करण्यात यावी.

**बालाजी कल्याणकर** सौ.शैलजा किशोर स्वामी यांची महापौर पदी व श्री शफी अहेमद कुरेशी यांची उपमहापौरपदी निवड झाल्याबध्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांना भावी कामात शुभेच्छा देतो.पक्ष आदेशानुसार मा.महापौरांनी माझी विरोधी पक्ष नेतेपदी निवड केली त्याबदल त्यांना धन्यवाद,शहर विकास कामासाठी शिवसेना पक्षाने सहकार्य केलेले आहे यापुढे महापौरांना आमचे पक्षाचे सहकार्य राहील. शहर विकास कामात दुर्लक्ष होत असेल तर आम्ही शिवसेना पक्षाचेवतीने आवाज उठवू.

**अनुजा तेहरा** आपले आयुक्त स्मार्ट सिटीचे संदंर्भात जपान दौ-यावरुन जावून आले त्याबध्दल मी त्यांचे अभिनंदन करते. त्यांनी जपान दौरा करुन काय साध्य केले आयुक्त साहेब नांदेड शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश

करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. परंतु नेमके तांत्रिक दृष्टया स्मार्ट सिटी म्हणजे काय याचे आम्हाला ज्ञान नाही. नांदेड शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश झाला तर आम्हाला त्याचा गर्व आहे अभिमान आहे. परंतु यामूळे नांदेड शहरातील नागरीकांना काय सुविधा मिळणार आहे.आज बोरबन फॅक्ट्री परिसरातील मलनिस्सारण लाईन वरील चेंबरवर चेंबर कव्हर नसल्यामूळे चेंबर उघडे पडलेले आहे. पुर्ण रस्त्यावर खडे पडलेले आहे. ड्रेनेज चेंबरवर कव्हर नसल्यामूळे त्यामध्ये गाय पडली होती ती अग्नीशमन विभागातील कर्मचा-यांनी काढली यासंदर्भात प्रजावाणीत बातमी प्रसिध्द झाली होती याबातमीच्या कात्रणासहीत तक्रार एक महिण्यापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता श्री गिरीश कदम यांचेकडे केली होती परंतु त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही. शहरातील रस्त्याची दुरुस्ती, ड्रेनेज चेबंरची दुरुस्ती करणे, ड्रेंनेज चेंबरवर चेबर कव्हर बसविणे, नांल्याची दुरुस्तीची कामे प्रथम करण्यात यावी त्यानंतर स्मार्ट सिटीसाठी प्रयत्न करावा ,श्री गिरीश कदम कार्यकारी अभियंता आज सभागृहात नाही त्यांना सर्वसाधारण सभा असतांना सुटी कशी काय देण्यात आली.माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे.

**रामनारायणजी काबरा** केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेत समाविष्ट होण्यासाठी केंद्र शासनाच्या कोणकोणत्या अटी व शर्ती आहेत व या योजनेत समाविष्ट होण्यासाठी महानगरपालिकेने कोणकोणत्या बाबीची पुर्तता करणे आवश्यक आहे यांचा खुलासा करण्यात यावा.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** महानगरपालिकेत लहान सहान दुरुस्तीची कामे करण्यासाठी जसे, ड्रेनेज चेंबरची दुरुस्ती ,चेंबर कव्हर बदलणे, रस्त्यावर मुरुम टाकणे, यंत्र सामुग्री दुरुस्ती करणे आदी कामाकरीता अधिका-यांना आर्थिक पाठबळ असणे आवश्यक आहे. मागील अडीच वर्षात अधिका-याकडे अशा कामाकरीता अधिका-यांना अभियंत्यांना अग्रीम रक्कम देण्यात आली होती त्यातुन मेन्टनन्सची कामे करण्यास अडचण येत होती आता नगरसेवकानी अधिका-यांना, अभियंत्यांना काम सांगितले अधिकार नसल्याचे सांगतात ,अधिका-यांना अभियंत्यांना मेन्टनन्सचे काम करण्याचे अधिकार दिले तर लहान सहान कामे लवकर होतील.

**विनय पाटील** सिडको हडको व नविन मोंढा महागनरपालिकेस हस्तांतरीत करते वेळेस सिडको प्रशासनाने फक्त सिडको हडको,नविन मोढा परिसराचा विकास करण्यासाठी महानगरपालिकेस ९ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध्द करुन दिला होता.परंतु महानगरपालिकेने सिडकोने दिलेला ९ कोटीचा निधी त्या भागाचा विकास करण्यासाठी न वापरता इतर कामासाठी वापरला ,सिडको भागातून १० नगरसेवक निवडून आलेले असून सिडको हडको भागाची लोकसंख्या जवळपास ६० ते ७० हजार आहे. या भागातील लातूररोड डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते रमा माता चौक, महाराणा प्रताप पुतळा ते हडको बस स्टॉप हे महत्वाचे दोन रस्त्यावर जागोजागी एक एक फुटाचे खडे पडल्यामूळे नागरीकांना रस्त्यावरुन पायी चालणे, वाहन चालविणे अवघड झालेले असून दररोज या रस्त्यावर अपघात होत असल्यामूळे या भागातील नागरीक नगरसेवकांना धारेवर धरत आहे.महापौरांनी या रस्त्याची पाहणी केलेली आहे. या रस्त्याची दुरुस्तीसाठी निविदा काढण्यासाठी वारंवार आयुक्तांना शिफारस करण्यात येत आहे. सिडको ने जो ९ कोटीचा निधी दिलेला आहे तो कशाकरीता दिला होता त्यावेळी महानगरपालिकेने सिडको बरोबर काय करार केलेला आहे याची माहिती देण्यात यावी.

**संजय मोरे** सिडको प्रशासनाने सिडकोभागातील विकास कामासाठी रु.९.०० कोटीचा निधी दिली होता परंतु सदरील निधी सिडको भागातील विकास कामासाठी न वापरता इकडे तिकडे खर्च केला हा निधी इतरत्र खर्च करण्यासाठी सर्वसाधारण सभेचे मान्यता घेण्यात आलेली नाही. प्रशासनाने आपल्या मर्जीने इतर ठिकाणी कसा काय निधी खर्च केला याचा खुलासा करण्यात यावा.सिडको हडको भागातील रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झालेली असल्यामूळे नागरीक नगरसेवकांना शिव्या देत आहेत.यारस्त्याची दुरुस्ती लवकरात लवकर करण्यात यावी.

**डॉ.करुणा जमदाडे** नुकत्याच महापौर पदी विराजमान झालेल्या सौ.शैलजा किशोर स्वामी, उपमहापौर श्री शफि अहेमद कुरेशी ,तसेच विरोधी पक्ष नेते म्हणून मान्यता देण्यात आलेले श्री बालाजी देविदासराव कल्याणकर यांचे अभिनंदन करते. व त्यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव सभागृहात मांडते. माजी महापौर श्री अ.सत्तार अ.गफुर, माजी उपमहापौर श्री आंनद चव्हाण ,माजी विरोधी पक्षनेते यांनी त्याचे अडीच वर्षाच्या काळात सर्वाना विश्वासात घेवून सभागृहाचे कामकाज चालविले,अनेक विकासाची कामे केली त्याबध्दल मी त्याचेही अभिनंदन करते. आणि माजी विरोधी पक्षनेते श्री दिपकसिंहजी रावत यांचेही या सभागृहास खुप मोठे सहकार्य मिळाले त्याबध्दल त्यांचेही मी अभिनंदन करते. श्री विनय गिरडे पाटील ,सभापती ,स्थायी समिती यांनी सिडको प्रशासनाने दिलेला ९ कोटीचा निधी सिडको भागात विकासाची कामे न करता इतर ठिकाणी कसा व कोणकोणत्या कामासाठी खर्च करण्यात आला याची माहिती मागितली आहे ती माहिती देण्यात यावी.

**रजिया बेगम** डॉ.सौ.करुणा जमदाडे यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर पदी सौ.शैलजा किशोर स्वामी ,उपमहापौर पदी श्री शफी अहेमद कुरेशी , विरोधी पक्षनेते पदी श्री बालाजी देविदासराव कल्याणकर यांची निवड झाल्याबध्दल त्याचे अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे .

**ठराव क्र. २** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर पदी सौ.शैलजा किशोर स्वामी व उपमहापौर पदी श्री शफी अहेमद कुरेशी, व विरोधी पक्ष नेता म्हणून श्री बालाजी देविदासराव कल्याणकर यांची निवड झाल्याबध्दल त्यांचे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते अभिनंदन करते.

**विनय पाटील** शासनाने विकास कामासाठी निधी दिलेला असतांना तो दुस-या कामावर खर्च करता येतो काय असा निधी खर्च करावयाचा असेल तर त्यास महासभेचे मान्यता घेणे आवश्यक नाही काय

**आयुक्त** श्री विनय पाटील,सभापती स्थायी समिती यांनी सिडकोने दिलेला ९ कोटी पैकी काही निधी इतर कामासाठी कसा खर्च केला याचा खुलासा मागितला आहे. परंतु तत्कालिन आयुक्तांनी त्यावेळेची परिस्थिती विचारात घेवून सर्वसाधरण सभा, स्थायी समिती यांचे मान्यतेने प्राप्त निधी इतर कामासाठी वळविला आहे.

**विनय पाटील** इतर कामासाठी निधी खर्च करावयाचा असेल तर त्यास सभागृहाची परवानगी घेणे आवश्यक होत परंतु सभागृहाची परवानगी न धेता कर्मचा-याच्या पगारावर निधी खर्च करण्यात आलेला आहे. उत्पन्न वाढल्यानंतर कर्मचा-यांच्या पगाराची रक्कम या निधीत परत वळती करावयास पाहिजे होती.

**अ.सत्तार** सिडकोने ९ कोटीचा रुपयाचा निधी दिला होता परंतु त्यावेळी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असल्यामूळे कर्मचा-यांचे दोन महिण्याचे पगार रुकले होते त्यामूळे कर्मचा-यांच्या पगाराकरीता या निधीतून पैसे काढुन कर्मचा-याचे पगार करण्यात आले.विकास कामाचा निधी पगारावर खर्च केल्यामूळे हा पैश्याचा मिसयुज झालेला आहे. पैसे आल्यानंतर यानिधीत पैसे जमा करावयास पाहिजे होते.तसेच करण्यात आलेले नाही. इतर कामाकरीता पैसे खर्च करत असतांना त्यास कोणत्या सभेची परवानगी घेण्यात आली त्याचा खुलासा करावा.

**आयुक्त** याप्रकरणाची सविस्तर माहिती पुढील सभेत देण्यात येईल.

**विरेंद्रसिघ गाडीवाले** सिडको भाग महानगरपालिका हस्तांतरीत करतांना सिडकोत विकासाची कामे करण्यासाठी मा.खा.श्री अशोकरावजी चव्हाण साहेब यांच्या प्रयत्नाने सिडकोने महानगरपालिकेस रु.९ कोटीचा निधी दिला होता परंतु तत्कालिन आयुक्तानी सदरचा निधी इतर कामासाठी खर्च केलेला आहे.आता सिडको हडको भागात विकासाची कामे करण्यासाठी प्रशासनाने काय नियोजन केलेले आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**विनय पाटील** लातूर रोड आंबेडकर चौक ते रमा माता चौक रस्ता व सिडको हडको मुख्य रस्ता हे दोन रस्ते अत्यंत खराब झालेले असल्यामूळे हे दोन्ही रस्ते तातडीने दुरुस्त होणे आवश्यक असल्यामूळे या रस्त्याची कामे कामे मार्गी लावावे अशी आमची मागणी आहे. १३ वा वित्त आयोगाचा निधी हा सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता खर्च करण्यात येत आहे. १३ वा वित्त आयोगाचा निधीचा विनियोग कसा करावयाचा या संदर्भात शासनाच्या काही गाइड लाईन आहेत काय, कोणत्या कामासाठी खर्च करावा याबाबत काय तरतूद आहे याची माहिती देण्यात यावी.

**( १३ वा वित्त आयोग निधी विनियोगाचा शासन निर्णय वाचुन दाखविण्यात आला)**

**आयुक्त** आपणास कल्पणा आहे विष्णुपुरी शंकर जलाशयातील पाण्याचा साठा कमी झाल्यामूळे नांदेड शहरास पाण्याची तिवृ पाणी टचाई निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामूळे अप्पर पैनगंगेचे पाणी घेण्याची रु.१५ कोटीची तातडीची पाणी पुरवठा योजना तयार करुन त्यास शासनाची मान्यता घेण्यात आली या योजनेचे काम तातडीने पुर्ण होण्यासाठी तसेच वखार महामंडळाची जागा हस्तांतरीत करण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या रक्क्कमेचा भरणा करण्याकरीता १३ वा वित्त आयोगाचा निधी खर्च करण्यात आलेला आहे,जो काही निर्णय घेण्यात आलेला आहे तो महानगरपालिकेतील पदाधिका-यांशी विचार विनिमय करुन नागरीकांच्या व महानगरपालिकेच्या हिताचा घेण्यात आलेला आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीसाठी वखार महामडळाच्या जागेवर व्यापारी संकुल बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.

**दिपकसिंह रावत** निधीचे वर्गीकरण करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत परंतु त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. आपण सर्वसाधारण सभेची मान्यता न धेता निधी खर्च केलेला आहे किंवा नाही. शासनाचे जीआर प्रमाणे आपण कार्यवाही केलेली आहे काय

**आयुक्त** तत्कालिन महापौरांशी विचार विनिमय करुनच सर्व साधारण सभेची मान्यता अपेक्षित धरुन जनहितार्थ निर्णय घेण्यात आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यतेसाठीचा प्रस्ताव महासभेत सादर करण्यात येईल.घेण्यात आलेला निर्णय चुकीचा वाटत असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो.

**अ.सत्तार** नांदेड शहरासाठी पर्यायी तातडीची पाणी पुरवठा योजनेसाठी कामाची निकड व गरज लक्षात घेवून १३ वा वित् आयोगाच्या निधी वळता केला त्याबध्दल मी आयुक्तांचे अभिनंदन करतो.जनतेच्या हिताकरीता निर्णय घेतला असल्यामूळे दिलगिरी व्यक्त करण्याची आवश्यकता नाही. सिडको हडको भागातील मुख्य रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. रस्ता दुरुस्ती शिर्षकात पैसे शिल्लक नसेल तर इतर शिर्षकातील रक्कम वळती करुन रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी. प्रशासन आपल्या अधिकारात २५-२५ लक्षाची कामे करुन त्यास स्थायी समितीकडुन कार्योत्तर मान्यता घेते त्याच प्रमाणे स. सदस्यांनी तातडीचे कामाची शिफारस केली असेत तेही काम करण्यात यावे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** आयुक्तांनी तातडीची पाणी पुरवठा योजने करीता व वखार महामंडळाची जागा हस्तांतरीत करण्यासाठी १३ व्या वित्तं आयोगाची निधी वापरण्याचा जो तात्पुरता निर्णय घेतला तो तत्कालिन महापौर, उपमहापौर यांचेशी विचार विनिमय करुन जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न असल्यामूळे घेतलेला आहे. शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीतून १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करावयाचे कामासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्याचे, तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत परंतु कामाची निवड करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेचा आहे.

**अभिषेक सौदे** सिडकोने दिलेल्या ९ कोटीचा निधीपैकी काही निधी कर्मचा-याचा पगार झालेला नसल्यामूळे कर्मचा-यांच्या पगारावर खर्च करण्यात आला परंतु सिडको भागातील रस्त्याची दुरुस्ती करण्याचाही विचार करुन रस्त्याचे दुरुस्तीसाठी लवकरात लवकर निविदा मागविण्यात यावेत अशी आमची विनंती आहे.

**स.शेर अली** देगलूर नाका भागातील उद्यानाचा विकास करण्यासाठी ट्रेचिंग ग्रावुंडची जागा आरक्षित करण्यात आलेली असून या उद्यानाचा विकास करण्यासाठी अंदाजपत्रकात १३ व्या वित्ता आयोगाच्या निधीतून १.०० कोटीची तरतूद करण्यात आलेली असल्यामूळे उद्यानाचा विकास करण्यात यावा.

**शेख बावजीर** स्मार्ट सिटी म्हणून नांदेड शहराचा समावेश करण्यात येत आहे परंतु प्रभाग ३३ मधील नागरीकांना मागील १५-२० वर्षापसून कोणत्याच मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत. पाणी पुरवठा, ड्रेनेज,नाल्या,लाईट ई.सुविधा देण्यात येत नाही ग्रामपंचायत सारखी परिस्थिती आहे. आयुक्त, महापौरांना उपमहापौरांना विनंती आहे की प्रभाग क्र.३३ ला भेट देवून त्या ठिकाणी कोणकोण सुविधा नाहीत त्या उपलब्ध्द करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात यावा.

**अभिषेक सौदे** १३ वा वित्त आयोगाचा निधी इतरत्र वळविण्यात आलेला आहे.दिड दोन महिण्यापासून सिडको, ,असदवन,जूना नवा कौठा,वसरणी भागातील रस्ते लाईन टाकयासाठी खोदून ठेवण्यात आलेले आहे परंतु ते अद्याप दुंरुस्त करण्यात आलेले नाही.एकही ट्रक मुरुम टाकण्यात आलेला नाही. लवकरच पावसाळा सुरु होत असून ऐन पावसाळयात रस्त्यावर चिखल झाल्यानंतर रस्ते दुरुस्त करण्यात येणार आहे काय .

**महापौर** पावसाळा सुरु होण्यापुर्वी रस्त्याची दुरुस्ती ,नाल्यांची साफसफाई होणे आवश्यक आहे त्यामूळे आयुक्तानी त्वरीत शहरातील रस्त्यांची व नाल्याची साफसफाईची मोहिम राबवावी.

**सरजितसिंघ गिल** १३ वा वित्त आयोगाच्या निधीबाबत स. सदस्यांनी खुप चर्चा केली. शहरात पाणी टंचाई निर्माण झाल्यामूळे दोन दिवसा आड पाणी पुरवठा करण्यात येत आहे. पाण्याची समस्या कायम स्वरुपी सोडण्यासाठी रु.१५ कोटीची तातडीची पाणी पुरवठा योजना तयार केली ही योजना कार्यान्वीत होण्यासाठी महानगरपालिकेकडे निधी नसल्यामूळे १३ वा वित्त आयोगाचा निधी या योजने करीता वळविण्याचा निर्णय आयुक्तांनी महापौर, उपमहापौर यांना विश्वासात घेवूनच घेतलेला आहे त्याबध्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. आयुक्तांनी संयमाने घेवून ही बाब मनावर घेवू नये.

**अ.हबीब बागवान** देगलूर नाका रस्त्या दुरुस्तीचे काम का बंद करण्यात आलेले आहे या रस्त्याचे काम केंव्हा पुर्ण होईल याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** रस्ता दुरुस्तीसाठी तांत्रिक बाब उपस्थित झालेली आहे त्यावर येत्या (८) दिवसात मार्ग काढून रस्त्याचे काम पुर्ण करण्यात येईल.

**विनय गुर्रम** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्य वतीने थोर महापुरुषांच्या जयंत्या पुण्यतिथ्या साज-या करण्यात येतात. त्यानुसार महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्य महाराणा प्रतापसिंह यांचे पुतळयास रंगरगोटी, पुतळा परिसरातील साफसफाई , ई. कामे करण्यासाठी आयुक्त साहेबांना सुचना करण्यात आली होती व त्या प्रमाणे आयुक्तानी सर्व संबंधित विभागाना ८-१० कामे करण्यासाठी आदेशित केले होते एकाही विभाग प्रमुखांनी आयुक्तांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे कामे केलेली नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जे रंगरंगोटीचे जे काम करण्यात आलेले आहे ते पुर्ण बोगस झालेले आहे. त्यामूळे ज्या अधिका-यांनी कामात निष्काळजीपणा केलेले आहे त्या अधिका-या विरुध्द कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी आम्ही केली होती परंतु १५ दिवस झाले आज पर्यत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. महारणा प्रतापसिंह

यांच्या जयंती दिनी पुतळयास हार टाकण्यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्यात आली नव्हती. विरोधीपक्ष नेत्यासह व इतर सदस्यासह यांच्या पुतळयास हार टाकण्यासाठी गेलो होतो त्यावेळी लिफटच्या तांत्रीक कारणामूळे लिफट बंद पडून त्यामध्ये आम्ही जवळपास दिडतास अडकलो होतो अग्नीशमन विभागातील कर्मचा-यांनी आम्हाला सोडविले त्याबध्दल मी अग्नीश्मन विभागातील कर्मचा-याचे अभिनंदन करतो. यास जे दोषी अधिकारी आहेत त्यांचे विरुध्द काय कार्यवाही करणार आहात याचा खुलासा करण्यात यावा.

**सविता कंठेवाड** आम्हीही महाराणा प्रतापसिंह यांचे जयंती निमित्य महाराणा प्रतापसिंह यांचे पुतळयास हार घालण्ण्यासाठी गेलो होतो त्यावेळी विराधी पक्ष नेत्यासह नागरीक व सदस्य लिफट मध्ये अडकलेले होते ही घटना आम्ही मोबाइलवर महापौर उपमहापौरांना कळवीली, महानगरपालिकेतर्फे ज्या ज्या महापुरुषांची जयंती साजरी करण्यात येते त्या दिवशी पुतळयाजवळ जनरेटर, शिडी, रुग्णवाहिका ई,व्यवस्था जयंती साजरी करण्याच्या एक दिवस अगोदर करण्यासाठी आयुक्तांनी संर्व संबंधितांना आदेश द्यावेत.

**विनय गुर्रम** पुतळा रंगरंगोटीचे काम बोगस झालेले असल्यामूळे या कामाची चौकशी करण्यात यावी. आयुक्तानी विविध व्यवस्था करण्यासाठी आदेश दिले होते त्याची अमलबजावणी करण्यात आली नाही.त्याठिकाणी रुग्णवाहिका उभी करण्यात आलेली नव्हती.

**फारुख अली खा** लवकरच पावसाळा सुरु होत आहे.शहरातील साफसफाई, नाल्याची साफसफाईची काय परिस्थिती आहे. माझे प्रभागातील पिरबु-हानगर, सहयोगनगर या भागातील नाल्याची साफसफाई गेल्या अनेक दिवसापासुन करण्यात आलेली नाही. हीच परिस्थिती शहरातील इतर भागाची असून मोठया प्रमाणात गंदगी वाढलेली आहे. आम्ही प्रत्येक सभेत साफसफाईच्या कामाबाबत चर्चा करतो परंतु कार्यवाही होत नाही. सभेत एटूझेडची हकाल पटी करुन साफसफाईच्या कामासाठी नव्याने निविदा मागविण्यात याव्यात अशी मागणी करतो परंतु आज पर्यत एटूझेडची हकाल पटी करण्यात आली नाही उलट त्यांचेकडूनच साफसफाईचे काम करुन घेण्यात येत आहे. प्रभागात साफसफाई होत नसल्यामूळे नागरीक स.सदस्यांना बोलत आहे, आणि त्याचे हे बोलणे वाजवी आहे कारण ते महानगरपालिकेचे मालमत्ता कर , पाणी पटी व इतर कराचा भरणा करतात त्यांना नागरी सुविधा देण्याचे आपले कर्तव्य आहे.प्रभागातील रस्ते खराब झालेले आहे. रस्त्यातील, खडयामध्ये एक टोपले मुरुम सुध्दा टाकण्यात येत नाही.आर्थिक परिस्थिती खराब असल्यामूळे कामे काढता येत नाही असे सांगण्यात येते परंतु शहरातील साफसफाईचे कामासाठी पैसे लागत नाही. मॅनपॉवरचे तरी कामे व्हावयास पाहिजे. रिलायन्स कंपनीने केबल लाईन टाकण्यासाठी रस्ते खोदुन टाकले. त्यांना रस्ते फोडण्यासाठी कशी काय परवानगी देण्यात आली. चैतन्य नगर ते जंगमवाडी पर्यतचा रस्ता पुर्ण खोदुन ठेवला त्याची दुरुस्ती करण्यात येत नाही. नागरीकांना साफसफाई, पाणी पुरवठा,रस्ते आदी सुविधा उपलब्ण्द करुन द्यावयास पाहिजे.

**विनय गुर्रम** पावसाळा सुरु होत असून दरवर्षी सखल भागात राहणा-या गोर गरीबांच्या घरात पाणी शिरते त्यामूळे पावसाळा सुरु होण्यापुर्वी पोकलेन मशिनव्दारे सखल भागातील नाल्याची साफसफाई करण्यात यावी. मा.महापौर यांनी आमचे प्रभागात भेट देवून साफसफाईच्या कामाची पाहणी केली नालीवरील अतिक्रमणकाढून नालीतील गाळ काढण्यासाठी सबंधितांना आदेशित केले त्याबदल मी त्याचे अभिनंदन करतो.महापौरांनी झोन निहाय झोन कार्यालयात त्या त्या भागातील नागरीकाची बैठक घेवून त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात व त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा .

**सविता कंठेवाड** सौ.शैलजा किशोर स्वामी यांची महापौर पदी श्री शफी अहेमद कुरेशी उपमहापौर पदी व श्री बालाजी कल्याणकर याची विरोधी पक्षनेते पदी निवड झाल्याबध्दल मी त्यांचे अभिनंदन करते. माजी महापौर श्री अ.सत्तार यांनी ज्या प्रकारे कामकाज केले जी प्रथा पाडली तीच प्रथा नविन महापौर कायम ठेवतील अशी मी अपेक्षा करते. प्रभागात बिएसयुपी योजेने कामे सुरु असून त्याबाबतीत खुप गंभिर प्रश्न आहे यावर मागील सभेत बरीचशी चर्चा करण्यात आली बिएसयुपीच्या करीता स्वतंत्र विशेष सभा बोलविण्यात येईल असे सांगण्यात आले होते परंतु आज पर्यत विशेष सभा बोलाविण्यात आलेली नाही.अधिकारी एक एक महिणा सुटीवर जातात त्यामूळे या गंभिर प्रश्नावर चर्चा करण्यास वेळ मिळत नाही.

**नवल पोकर्णा** आयुक्तांनी तातडीच्या पाणी पुरवठा योजनेसाठी तसेच उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून वखार महामंडळाची जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यासाठी १३ वा वित्त आयोगाचा निधी वापरला त्याबदल त्याचे मी विशेष आभार मानतो. मागे तीन दिवस नांदेड शहरात वादळी वा-यासह पाऊस पडला त्यावेळी माझ्या प्रभागातील मुख्य रस्त्यावरील २० झाडे रस्त्यावर पडली होती विद्युत पोल वाकल्यामूळे तारा तुटल्याने विद्युत पुरवठाही खंडीत झाला होता. पाणी पुरवठा विस्काळीत झाला अशा आपत्तीच्या काळात सर्व संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचा-यांनी रात्रदिवस मेहनत घेवून रस्त्यावरील झाडे काढुन रस्ता वाहतुसाठी

मोकळा केला, पुर्ववत विद्युत पुरवठा सुरु करुन विद्युत लाईट चालू केले.आयुक्तही स्वतः उपस्थित होते .त्याबध्दल मी त्यांचे अभिनंद करतो.माझ्या प्रभागातील अर्धवट रस्त्याचे काम झालेले आहे सदर रस्त्याचे कामत्वरीत पुर्ण करुन देण्यात यावे.

**अंजली गायकवाड** नविन महापौर सौ.शैलजा किशोर स्वामी ,उपमहापौर श्री शफी अहेमद कुरेशी , विरोधी पक्षनेते श्री बालाजी देविदासराव कल्याणकर यांची मी अभिनंदन करते. त्यांना शहर विकास कामास आमचे सर्वतोपरी सहकार्य राहील. माझ्या प्रभागातील लालवाडी भागात मोठा नाला असून पावसाळयात दरवर्षी या नाल्याचे पाणी नागरीकांच्या घरात जाते,मागील वर्षी तत्कालिन पालकमंत्री,व आयुक्त यांनी भेट देवून या यानाल्याची पाहणी करुन त्याभागातील नागरीकांना खुप आश्वासने दिली होती परतु अद्याप त्याची पुर्तता झालेली नाही. या नाल्यात मोठया प्रमाणात गाळ व झुडूपे वाढलेली असल्यामूळे या नाल्याची पावसाळयापुर्वी साफसफाई करुन नाला प्रवाहित करुन देण्यात यावा जेणे करुन पावसाळयात नागरीकांच्या घरात पाणी जाणार नाही.

**रजिया बेगम** रमजान महिणा सुरु होत असून आमचे प्रभागात असलेल्या मस्जीद जाण्यासाठी असलेल्या रस्त्याची, दुरुस्ती करण्यात यावी, रमजानच्या काळात सर्व लाईट चालू राहतील, नियमित साफसफाई होइल याकडे लक्ष देण्यात यावे अशी आयुक्तांस विनंती आहे.

**विनय गुर्रम** स्मार्ट सिटी संदर्भात आयुक्त जपान दौरा करुन आले त्याबध्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.आयुक्त साहेबानी जपान मधील स्वच्छतेची पाहणी केलेली आहे.त्याप्रमाणे नांदेड शहरात स्वच्छता मोहिम राबवावी. एटूझेड कंपनीच्या कर्मचा-यांकडून शहरातील नियमित साफसफाई व्यवस्थीत होते किंवा नाही याची पाहणी करावी.गुरु ता गध्दी अंतर्गत करण्यात आलेल्या कामाची वाट लागली तसा प्रकार स्मार्ट च्या कामात होवू नये, चांगली कामे करण्यात यावी.आमचे प्रभातील ड्रेनेज,पाणी पुरवठा,साफसफाई नाल्याचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही.दलित वस्तीही मोठया प्रमाणात आहे परंतु दलित वस्ती योजने अतर्गत कामे होत नाही. आयुक्त साहेबानी आमच्या प्रभागास भेट देवून नागरी सुविधाची पाहणी करावी,

**रामनारायणजी काबरा** महागनरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीची श्वेतपत्रिका काढावी. म्हणजे आपणास खर्च व उत्पन्नावर सविस्तर चर्चा करता येइल.

**दिपकिंसह रावत** एटूझेड साफसफाईच्या कामाकरीता वापरीत असलेल्या वाहनाची माहिती देण्यासाठी पत्र दिलेले आहे त्याचे उत्तर देण्यात आलेले नाही. एटूझेड कचरा उचलण्याकरीता जी वाहने वापरीत आहेत त्यांच्या मालकीचे नाहीत ते युपीचे आहेत व त्याचे रजिस्ट्रेशन नंबरही युपीचे आहे. यावाहनांचा इन्शुरन्स काढलेला आहे किंवा नाही याची माहिती नाही. नव्याने साफसफाईच्या कामासाठी निविदा मागविण्यात आले परंतु प्राप्त निविदा एक लिफाफा उघडण्यात आलेला नाही .लवकरात लवकर निविदा अंतिम करण्यात यावा

**आयुक्त** साफसफाईचे कामासाठी झोन क्र.१,२,६ झोन क्र.३,४ व झोन क्र.५ असे तिन भागाकरीता निविदा मागविण्यात आले होते झोन क्र.१,२,६ करीता ३ निविदा झोन क्र.३,४ ,झोन क्र.५ करीता प्रत्येकी एक निविदा प्राप्त झालेली आहे. निविदा मंजुरीचा प्रस्ताव स्थायी समितीर निर्णयास्तव ठेवण्यात येईल.स्थायी समितीच्या गाईड लाईन प्रमाणे त्यावर निर्णय घेईल.

**विनय गुर्रम** महारणा प्रतापसिंह यांचे पुतळयाच्या संदर्भात मी जो प्रश्न उपस्थित केलेलाआहे त्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे.

**दिपकिंसह रावत** महाराणा प्रतापसिंह यांचे जयंतीनिमित्य व्यवस्था करण्यासाठी आयुकत साहेबांनी जे आदेश काढले होती त्याची अमलबजावणी झाली किंवा नाही याचा खुलासा या देण्यात यावा. लिफट मध्ये दिड तास आम्ही अडकलो होतो. ज्या ज्या अधिका-यांनी आपल्या आदेशाची पायमल्ली केली त्या अधिका-या विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**अ.सत्तार** काम बोगस झालेले असेल तर विरोधीपक्ष नेत्याचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती कायम करण्यात यावी.

**आयुक्त** लेखी तक्रार देण्यात यावी त्यानुसार चौकशी करुन सेवा नियमाचे उल्लंघन झालेले असेल तर संबंधित अधिका-या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येइल.

**दिपकसिंह रावत** स्मार्ट सिटी बाबत चर्चा करीत आहोत परंतु ग्रीन सिटी बाबत कोणी चर्चा करीत नाही. मागील सहा सात वर्षापासून गुरुव्दारा लंगर साहिबचे बाबा बलविंदरसिंघजी व बाबा नरींदरसिंघ यांच्या वतीने शहरात ग्रीनसिटी अंतर्गत मोठया प्रमाणात वृक्षारोपन करण्यात येत असल्यामूळे त्यांना आर्थिम मदत देण्यासाठी दरवर्षी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येते परंतु त्याची अमलबजावणी होत नाही. बाबा बलविंदरसिंघजी यांना आपण काही आर्थिक मदत देणार आहोत किंवा नाही. त्यांनी लावलेल्या झाडांचे संरक्षण होण्यासाठी ट्रिगार्ड बसविणे. झाडाची देखभाल व संगोपन करणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे याकडे लक्ष द्यावयास पाहिजे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** आर्थिक मदत देण्याच्या संदर्भात आयुक्त साहेबांशी चर्चा केलेली आहे. गुरुव्दारा लंगर साहिबचे संत बलविंदसिंघजी मागील ७ वर्षापासून नांदेड शहरात वृक्षारोपनाचा कार्यक्रम राबवित असून त्यांनी आज पर्यत लावलेल्या वृक्षापैकी जवळपास ९०-९५ टक्के वृक्ष जतन झालेले आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने गुरु ता गध्दी कार्यक्रमा अंतर्गत वृक्षारापनाचा कार्यक्रम राबविला होता त्यावर जवळपास दोन ते अडीच कोटी खर्च करण्यात आला परंतु लावण्यात आलेल्या वृक्षापैकी फक्त ६टक्के वृक्ष जतन झालेले नाही.वृक्षारोपनाचे कार्यक्रमासाठी बाबा बलविंदरसिंघ यांना महानगरालिकेने आर्थिक मदत देणें आवश्यक असल्यामूळे ठोस निर्णय धेवून त्यांना मदत करण्यात यावी.

**महापौर** आयुक्तांनी अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतूदीप्रमाणे बाबा बलविंदरसिंघजी यांना वृक्षारोपनाचे कार्यक्रमासाठी आवश्यक ती आर्थिक मदत देण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

**सरजितसिंघ गिल** हा मानसन्मानाचा विषय आहे पैशाचा नाही. संत बाबा बलविंदसिंधजी यांच्या मार्फत राबविण्यात येत असलेल्या वृक्षारोपनाचे कार्यक्रमास २५ लक्षाची आर्थिक मदत देण्यास सर्वसाधारणसभेने मान्यता दिली होती परंतु याठरावाची अमलबजावणी करण्यात आली नाही.त्यानंतर बाबा बलविंदरसिंध यांच्या मार्फत शहरात मोठयाप्रमाणात वृक्षारोपनाची मोहिम राबविण्यात येत असल्यामूळे त्यांचा अभिनंदनाचा ठराव पासून करुन त्यांचा रु.५१ हजार नगदी देवून नांदेड भूषण पुरस्कार देवून त्याचा गौरंव करण्यात येइल असे तत्कालिन महापौर यांनी आश्वासन दिले होते परंतु त्यांना बांधकाम परवानगी द्यावयाच असून त्यामध्ये ही रक्कम अडजेस्टमेंट करण्यात येईल असे सांगण्यात आले मागील तीन वर्षापासून अंदाजपत्रकात एक लक्ष वृक्ष खरेदी करुन देण्यात येतील. ट्रि गार्ड खरेदी करुन देण्यात येतील ,वृक्षाची देखभाली करीता मजुराचा खर्च देण्यात येईल असा निर्णय घेवून ७५ लक्षाचे खर्चास मान्यता देण्यात आली परंतु आज पर्यत एक खडकुची मदत देण्यात आलेली नाही.ही लाजीरवाणी गोष्ट आहे. कैंद्र शासनाने श्री गुरु गोविंदसिघजी यांच्या नावाने रु.२००० कोटीचा निधी दिला त्यामूळे नांदेड शहराचा कायापालट झाला,बाबा बलविंदरसिंघजी यांनी नांदेड शहरात मोठया प्रमाणात वृक्षारोपन करुन हरितक्रांती केली ,त्यांनी लावलेले वृक्षापैकी ९०-०५ टक्के झाडे जतन झालेली आहे.दोन तीन आयुक्त आले परंतु त्यांना मदत केलेली नाही. गुरुव्दारा भागाचा विकास करण्याठी शिखाच्या मालमत्ता घेवून त्यांचे अबचलनगर भागात पुर्नवसन करण्यात आले त्या ठिकाणी चिनी माती ची मलनिस्सारण लाईन टाकण्यात आल्यामूळे ती लाईन वारंवार चोकअप होत आहे ती बदलण्याची मागणी करीत आहोत. एफएसआय दिड २ करणेसाठी सर्वसाधारण सभेन मान्यता दिलेली आहे परंतु त्यांची अमलबजावणी करण्यात येत नाही. श्री दिपकसिंह रावत यांनी सुचविल्याप्रमाणे ग्रीनसिटी करता बाबा बलविंदरसिंधजी यांना महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा.

**अ.सत्तार** गुरुव्दारा लंगर साहिबचे प्रमूख बाबा बलविंदसिंघजी यांनी मागील ७ वर्षापासून नांदेड शहरात मोठया प्रमाणात वृक्षारोपन करुन नांदेड ग्रीनसिटी केलेली आहे. वास्तविक पाहता वृक्षाची लागवड करुन पर्यावरणाचा समतोल राखण्याचे काम महानगरपालिकेचे आहे परंतु हे काम बाबा बलविंदसिंघजी यांनी केलेले आहे.या कामास त्यांना महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देण्यासाठी आपण मागील पाच वर्षापासून अंदाजपत्रकात तरतूद करीत आहोत परंतु त्याची अमलबजावणी होत नाही. श्री सरजितसिंघ गिल,श्री विरेंद्रसिंध गाडीवाले,श्री दिपकसिंह रावत यांनी सर्वसाधारण सभेत वारंवार प्रश्न उपस्थित केलेले आहेत.बाबा बलविदरसिंघ यांनी फक्त वृक्षारोपनच केलेले नाही तर नांदेड शहरातील नागरीकांवर जेव्हा जेव्हा नैसर्गिक आपत्ती आली त्यावेळी नागरीकांना मदत केलेली आहे. त्यामूळे महापौरांनी बाबा बलविंदरसिंघजी यांना सन्मानाने बोलावून त्यांचा मानसन्मान करावा. आयुक्तांनी नियमात बसवून महानगरपालिकेतर्फे त्यांना हरित शहरासाठी विशेष मदत देण्यासाठी प्रयत्न करावा.

**गुरुप्रितकौर सोडी** महानगरपालिकेने नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी मुख्य रस्त्यावरील विविध चौकात सिसिटिव्ही कॅमेरे बसविलेले आहे परंतु प्रभागातील अंतर्गत रस्त्यावरील चौकात सिसिटिव्ही बसविण्यात आलेले नाही.सध्या शहरात नागरीकांच्या घरावर दरोडयाचे व चोरीचे प्रमाण वाढलेले आहेत त्यामूळे अंतर्गत रस्त्यावरील चौकात सिसिटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले तर प्रभागातील घरावर दरोडया पडण्याचे व चोरीचे प्रमाणे कमी होईल.अशी माझी सुचना आहे. त्यावर विचार करण्यात यावा.

**विनय गुर्रम** बाबा बलविंदसिंघजी यांना वृक्षारोपनाचे कार्यक्रम राबविण्यासाठी आर्थिक मदत देण्यासंदर्भात मागील आडीच वर्षापासून श्री सरजितसिंघ गिल, श्री दिपकसिंह रावत, श्री विरेंद्रसिंध गाडीवाले या सभागृहात प्रश्न उपस्थित करीत आहेत परंतु आर्थिक मदत देण्यात येत नाही ही लाजिरवाणी गोष्ट आहे. नियमात बसवून त्यांना आर्थिक मदत देण्यात यावी.

**रामनारायणजी काबरा** बाबा बलविंदरसिंघज यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शहरात मोठया प्रमाणात वृक्षारोपन केलेले आहे त्यांचे हे कार्य हे निश्चितच भुषणास्पद आहे. त्यामूळे महानगरपालिकेच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात यावा व या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री यांना निमंत्रीत करण्यात यावे.

**दिपकसिंह रावत** दक्षिण जून्या नांदेड शहरात दुषित पाणी पुरवठा होंत असून दुषित पाण्यामूळे नागरीकांना साथीचे रोगाची लागन होण्याची शक्तयता आहे. नागरीकांना दोन तीन दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत आहे.तोही वेळेवर करण्यात येत नाही परंतु नागरीकांना पुर्ण वर्षभराची १८०० रुपयाची पाणी पटी आकारण्यात येते. हा नागरीकांवर अन्याय नाही काय ज्यादिवशी नागरीकांना पाणी पुरवठा करण्यात येतो त्याच दिवसाची पाणी पटी आकारण्यात यावी.अशी आमची मागणी आहे यावर सभागृह काय निर्णय घेणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.वार्षिक देखभाल व दुरुस्ती अतर्गत हातपम्प दुरुस्तीसाठी कंत्राट देण्यात आले होते परंतु ते रध्द करण्यात आले असल्यामूळे हातपंपही दुरुस्त होत नाही. त्यामूळे ना दुरुस्त हातपंप दुरुस्तीसाठी अभियंत्यांना अग्रीम रक्कम देण्यात यावी व त्यांना हात पम्प दुरुस्तीचे आधिकार देण्यात यावे.पाणी पुरवठा विभागातील कर्मचा-याना पाणी पुरवठया बाबत आम्ही फोन लावतो परंतु ते आमचे फोन उचलित नाहीत याचा खुलासा करण्यात यावा.

**महापौर** सध्या उन्हाळयाचे दिवस असल्यामूळे शहरात पाण्याची टंचाई निर्माण झालेली असल्यामूळे आयुक्तांनी शहरातील ना दुरुस्त असलेले हातपंप दुरुस्तीची मोहिम राबवून सर्व हातपंप दुरुस्त करावेत जेणे करुन नागरीकांना पाण्याची टंचाई जाणवणार नाही.

**आयुक्त** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील अधिका-यांना महानगरपालिकेच्या कामकाजासाठी संपर्क साधण्या करीता मोबाइल सिम दिलेले आहेत. महानगरपालिकेचे अधिकारी वेळ प्रसंगानुसार रात्री दोन दोन वाजेपर्यत काम करतात.श्री नवल पोकर्णा यांनी आताच सांगितले की वादळ वा-याने त्याचे प्रभागातील झाडे ,इलेक्ट्रीक पोल पडलेले होते तेंव्हा महागनरपालिकेच्या अधिका-याच्य टिमने दोन दोन वाजेपर्यत जागून मजुरांकडून कामे करुन घेवून रस्ता वाहतुकीस मोकळा करुन दिला, विद्युत पुरवठा सुरळीत करुन दिला, अधिका-याना कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त कैंव्हाही मोबाईल केल्यानंतर ते मोबाईल उचलतीलच याची गॅरंटी नाही.अधिका-याच्या व अभियंत्याच्या नेमणूका महानगरपालिकेने केलेल्या असल्यामूळे सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा. जून्या नांदेड शहरात अरुंद रस्ते ४-५ फुटाचे असून तेथे मलनिस्सारण लाईन व पाणी पुरवठ लाईन टाकण्यात आलेल्या आहेत, जमिनीखाली पाईप लाईन कोणत्या ठिकाणी लिकेजेस आहेत हे शोधणे खुप कठीण आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिनीखालील पाईप लाईन लिकेजेस मशिनव्दारे शोधून त्या दुरुस्ती करीत असल्याची माहिती मिळाली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून याबाबत मार्गदर्शन मागणविण्यात आलेले आहे. जून्या नांदेड भागातील नागरीकांच्या वैयक्तीक पाईप लाईन ही लिकेज असू शकतात त्या त्यांनी स्वतः दुरुस्त करावयावस पाहिजे. काही भागातील नागरीकांनी नळ कनेक्शनला जास्त पाणी येण्यासाठी नालीच्या बाजूनेच खडे केलेले असल्यामूळे त्या खडयातील पाणी पुन्हा पाणी पुरवठा बंद झाल्यानंतर पाईप लाईन मध्ये जावून दुषित पाणी पुरवठा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरीकांना स्वच्छ व निर्जतुक पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना करण्यात येत आहे.

**विषय क्र.१**

नांवामनपाकेतील पात्र कर्मचा-यांना दि.१ एप्रिल २०१४ ते ३१ जूलै २०१४ या कालावधीतील वाहतुक भत्याची थकबाकीची रक्कम अदाई करण्यासाठी नांवामनपा आदेश प.क्र.नांवाशमनपा/लेवि/६४३/२०१५ दि.१७ एप्रिल २०१५ अन्वये प्रशासकीय व आथिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.३** **ठराव**

नांवामनपाकेतील पात्र कर्मचा-यांना दि.१ एप्रिल २०१४ ते ३१ जूलै २०१४ या कालावधीतील वाहतुक भत्याची थकबाकीची रक्कम अदाई करण्यासाठी नांवामनपा आदेश प.क्र.नांवाशमनपा/लेवि/६४३/२०१५ दि.१७ एप्रिल २०१५ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**विषय क्र.२**

मा.श्रीमती अंजली सुरेश गायकवाड, स.सदस्या, नांवामनपा नांदेड यांनी दि.२०.४.२०१५ रोजी पत्र देवून दोन अडीच हजार वर्षाचा इतिहास असलेले, जगाला शांततेचे मार्ग देणारे तथागत भगवान गौतम बुध्द यांची जयंती महानगरपालिकेतर्फे साजरी करण्यात यावी. ज्यामूळे नविन उपक्रमाने समाजापुढे एकात्मतेचे प्रतिक दाखवून देवू शकते. व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. नाव उचावेल असे नमूद केले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(२१),(२२),(२५), (२६) व (४१) मधील तरतूदीनूसार तयार करण्यात आलेल्या नियमावलीमधील मुददा क्रमांक ०५ अन्वये नांवामनपाकडून थोर राजकिय व सामाजिक महापुरुषांच्या जयंती /पुण्यतिथी शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देषानुसार महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या सभागृहात साज-या करण्यात येतील. महानगरपालिकेची परंपरा व शासन निर्देशाव्यतिरिक्त इतर कोणतीही जयंती/पुण्यतिथी साजरी करता येणार नाही असे नमूद आहे.

शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या शासन परिपत्रकात व महानगरपालिकेच्या परंपरेनुसार तथागत भगवान गौतम बुध्द याची जयंती साजरी करणे बाबत अद्याप पावेतो कोणतेही आदेश प्राप्त नाहीत.

तथापी नावामनपा क्षेत्रातर्गत विविध सामाजिक संघटना व भारतीय बौध्द महासभा यांचे तर्फे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात बुध्द पौर्णिमे निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सदर ठिकाणी प्रतिवर्षी महानगरपालिकेतर्फे साफसफाई ,शामियाने ,ध्वनीक्षेपण ,पिण्याचे पाणी ,स्वतंत्र बॅराकेटींग इ.सुविधा पुरविण्यात येतात.

करीता स.सदस्यांनी पत्रात नमूद केल्यानुसार तथागत भगवान बुदध यांची जयंती प्रतिवर्षी महानगरपालिकेतर्फे साजरी करण्यास मान्यता देणे बाबत.

**दिपकसिंह रावत** — या प्रस्तावास आमचा विरोध नाही, परंतु यापुर्वी कधीही प्रशासनाचे प्रस्तावात स.सदस्याचे नांवाचा उल्लेख करुन प्रस्ताव सर्वसाधारण सभेत प्रस्ताव आलेला नाही. नव्हता परंतु आजच्या सभेत प्रथमच स.सदस्यांच्या नावानिशी प्रशासनाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडण्यात आलेला आहे हे नियमानुसार आहे काय. शासनामार्फत रामनवमी साजरी करण्याबाबत लवकरच शासन निर्णय घेणार आहे त्यामूळे सभागृहास माझी विनंती आहे की या प्रस्तावा बरोबरच महानगरपालिकेतर्फे दरवर्षी रामनवमी सुध्दा साजरी करण्चा निर्णय घेण्यात यावा.

**उमेश चव्हाण** — यापुर्वी सभागृहाने भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यासाठी मान्यता देवून त्याकरीता अंदाजपत्रकात तरतूदही करण्यात आली होती मुर्ती बसविण्याची जागाही निश्चित करण्यात आली होती परंतु या ठरावाची अमलबजावणी अद्याप करण्यात आलेली नाही.लवकरात लवकर ठरावाची अमलबजावणी करुन निश्चित केलेल्या जागेत भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यात यावी.

**नवल पोकर्णा** — श्री दिपकसिंह रावत यानी महानगरपालिकेतर्फे रामनवमी साजरी करण्याचा जो प्रस्ताव ठेवला आहे त्यास माझे अनुमोदन आहे.

**विनय गुर्रम** — याप्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सरजितसिंघ गिल** — या प्रस्तावास माझेही अनुमोदन आहे. सुधारणासह प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**अंजली गायकवाड** — प्रस्तावास मान्यता दिल्याबध्दल सभागृहाचे अभिनंदन करते.

**महापौर** — श्री दिपकसिंह रावत यांनी सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती प्रमाणे आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते,व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र. ४** **ठराव**

मा.श्रीमती अंजली सुरेश गायकवाड, स.सदस्या, नांवामनपा नांदेड यांनी दोन अडीच हजार वर्षाचा इतिहास असलेले, जगाला शांततेचे मार्ग देणारे तथागत भगवान गौतम बुध्द यांची जयंती महानगरपालिकेतर्फे दरवर्षी साजरी करण्यात यावी अशी विनती केलेली आहे. करीता स.सदस्यांनी यांनी केलेल्या विनंतीनूसार तथागत भगवान बुदध यांची जयंती प्रतिवर्षी महानगरपालिकेतर्फे साजरी करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

तसेच हिंदूचे प्रतिक प्रभू रामचंद्र यांचीही रामनवमी दरवर्षी महानगरपालिकेतर्फे साजरी करण्यात यावी असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.३**

श्री अभिषेक सौदे, स.सदस्य नांवामनपा नांदेड व श्री विजय निलंगेकर ,पत्रकार तथा संयोजक बुदध प्रभाग कार्यक्रम यांनी विश्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुदध् यांच्या जयंती निमित्याने मे महिण्यातील पौर्णिमेच्या दिवशी पहाटे ५.०० ते ८.०० या वेळेत भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात महाराष्ट्रातील ख्यातनाम गायकांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून सदर कार्यक्रमासाठी महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देण्याची यावी अशी विनंती दि.९.४.२०१५ व दि.२२.४.२०१५ रोजी केली होती , मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(२१),(२२),(२५), (२६) व (४१) अन्वये सास्कतिक कार्यक्रम /क्रिडा/महिला व बाल कल्याण संस्थाना देण्यात येणा-या अनुदानाची नियमावली तयार केली असून या नियमावली अनुदान वाटपाची कार्य पध्दत कलम ३ नियम ५ मध्ये नमूद केल्यानुसार कोणत्याही विविध पंजीकृत अथवा नोंदणी कृत शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्य, कला क्रिडा नाटय क्षेत्रातील संस्थेस किंवा त्या संस्थेच्या संलग्न संस्थेस ३ वर्षातून एकदा अनुदान देण्याची तरतूद आहे. तथापी अनुदान मागणीसाठी अर्ज करते वेळेस खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

१) संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

२) संस्थेच्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालाची प्रत

३) संस्थेचे चार्टड अकाऊन्ट यांच्या मार्फत झालेल्या लेखा परिक्षणची प्रत
४) शैक्षणिक ,साहित्य,कला,क्रिडा,व नाटय क्षेत्रातील काम करणा-या संस्थांना त्यांच्या विभगाच्या असलेल्या मान्यतेचे पत्र.

करीता उपरोक्त नियामावलीतील तरतूदीनुसार संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, संस्थेच्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालाची प्रत, संस्थेचे चार्टड अकाऊन्ट यांच्या मार्फत झालेल्या लेखा परिक्षणची प्रत , शैक्षणिक ,साहित्य, कला, क्रिडा, व नाटय क्षेत्रातील काम करणा-या संस्थांना त्यांच्या विभगाच्या असलेल्या मान्यतेचे पत्र.सादर करण्याच्या अटीवर तसेच महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता अपेक्षित धरुन वरील कार्यक्रमासाठी मनपा आदेश क्र.साप्रवि/११८५/२०१५ दि.२८.४.२०१५ अन्वये रु.५०,०००/- चे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर मान्यता देण्यात येते

**ठराव क्र.५** **ठराव**

श्री अभिषेक सौदे, स.सदस्य नांवामनपा नांदेड व श्री विजय निलंगेकर ,पत्रकार तथा संयोजक बुदध प्रभाग कार्यक्रम यांनी विश्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुदध् यांच्या जयंती निमित्याने मे महिण्यातील पौणिमेच्या दिवशी पहाटे ५.०० ते ८.०० या वेळेत भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात महाराष्ट्रातील ख्यातनाम गायकांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून सदर कार्यक्रमासाठी महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देण्याची यावी अशी विनंती दि.९.४.२०१५ व दि.२२.४.२०१५ रोजी केली होती , मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(२१),(२२),(२५), (२६) व (४१) अन्वये सास्कतिक कार्यक्रम /क्रिडा/महिला व बाल कल्याण संस्थाना देण्यात येणा-या अनुदानाची नियमावली तयार केली असून या नियमावली अनुदान वाटपाची कार्य पध्दत कलम ३ नियम ५ मध्ये नमूद केल्यानुसार कोणत्याही विविध पंजीकृत अथवा नोंदणी कृत शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्य, कला क्रिडा नाटय क्षेत्रातील संस्थेस किंवा त्या संस्थेच्या संलग्न संस्थेस ३ वर्षातून एकदा अनुदान देण्याची तरतूद आहे. तथापी अनुदान मागणीसाठी अर्ज करते वेळेस खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

१) संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
२) संस्थेच्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालाची प्रत
३) संस्थेचे चार्टड अकाऊन्ट यांच्या मार्फत झालेल्या लेखा परिक्षणची प्रत
४) शैक्षणिक ,साहित्य,कला,क्रिडा,व नाटय क्षेत्रातील काम करणा-या संस्थांना त्यांच्या विभगाच्या असलेल्या मान्यतेचे पत्र.

करीता उपरोक्त नियामावलीतील तरतूदीनुसार संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, संस्थेच्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालाची प्रत, संस्थेचे चार्टड अकाऊन्ट यांच्या मार्फत झालेल्या लेखा परिक्षणची प्रत , शैक्षणिक ,साहित्य, कला, क्रिडा, व नाटय क्षेत्रातील काम करणा-या संस्थांना त्यांच्या विभगाच्या असलेल्या मान्यतेचे पत्र.सादर करण्याच्या अटीवर तसेच महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता अपेक्षित धरुन वरील कार्यक्रमासाठी मनपा आदेश क्र.साप्रवि/११८५/२०१५ दि.२८.४.२०१५ अन्वये रु.५०,०००/- चे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**विषय:-४**

श्री विजय जोशी जिल्हा परिषद प्रतिनिनी, दैनिक सामना यांनी दिनांक २२.४.२०१५ च्या निवेदना व्दारे दिनांक ०१.०५.२०१५ रोजी महाराष्ट्र दिना निमित्त महाराष्ट्रातील विविध भागातील लोककला व परंपरेचे सांगड घालणारा मराठमोडया सांस्कृतीक कार्यक्रमाचे महानगरपालिकेच्या वतीने आयोजन केल्यास नांदेडकरांना सांस्कृतीक मेजवाणी लागेल त्यासाठी गंध मराठी मातीचा हा कार्यक्रम आयोजीत करुन महाराष्ट्रातील मराठवाडयातील दिग्गज कलावंतांना बोलावून सदर कार्यक्रम केल्यास शहरातील रसीक प्रेक्षकांना सांस्कृतीक मेजवाणी दिल्याचे स्मरण राहिल. त्यासाठी रु. २.०० लक्षाचे आनुदान देण्याची विनंती केली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(२१),(२२),(२५), (२६) व (४१) अन्वये सास्कतिक कार्यक्रम /क्रिडा/महिला व बाल कल्याण संस्थाना देण्यात येणा-या अनुदानाची नियमावली तयार केली असून या नियमावली अनुदान वाटपाची कार्य पध्दत कलम ३ नियम ५ मध्ये नमूद केल्यानुसार कोणत्याही विविध पंजीकृत अथवा नोंदणी कृत शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्य, कला क्रिडा नाटय क्षेत्रातील संस्थेस किंवा त्या संस्थेच्या संलग्न संस्थेस ३ वर्षातून एकदा अनुदान देण्याची तरतूद आहे. तथापी अनुदान मागणीसाठी अर्ज करते वेळेस खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

५) संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
६) संस्थेच्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालाची प्रत
७) संस्थेचे चार्टड अकाऊन्ट यांच्या मार्फत झालेल्या लेखा परिक्षणची प्रत
८) शैक्षणिक ,साहित्य,कला,क्रिडा,व नाटय क्षेत्रातील काम करणा-या संस्थांना त्यांच्या विभगाच्या असलेल्या मान्यतेचे पत्र.

वरील पैकी कोणतेही कागदपत्र अर्जदाराने अर्जा सोबत सादर केलेले नाही तथापि मुख्यलेखाधिकारी यांनी रु. ५०,०००/- अनुदान देण्याचा अभिप्राय दिला आहे. करिता उपरोक्त नियामावलीतील तरतूदीनुसार संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, संस्थेच्या वार्षीक लेखा परिक्षण अहवालाची प्रत, संस्थेचे चार्टड अकाऊन्ट यांच्या मार्फत झालेल्या लेखा परिक्षणची प्रत, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रिडा, व नाटय क्षेत्रातील काम करणा-या संस्थांना त्यांच्या विभगाच्या असलेल्या मान्यतेचे पत्र. सादर करण्याच्या अटीवर तसेच महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता अपेक्षित धरुन वरील कार्यक्रमासाठी मनपा आदेश क्र.साप्रवि/११८९/२०१५ दि.२८.४.२०१५ अन्वये रु.५०,०००/- चे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**नगरसचिव** मा.आयुक्त यांनी दि.१.५.२०१५ महाराष्ट्र दिनी संबंधितांनी कार्यक्रमाचे आयोजन न केल्यामूळे मनपा आदेश क्र.साप्रवि/११८९/२०१५ दि.२८.४.२०१५ अन्वये रु.५०,०००/- चे अनुदान देण्यास आलेली मंजुरी रध्द करण्यात आली असल्यामूळे प्रस्ताव परत घेण्यात येत असल्याचे लेखी कळविलेले आहे.

**महापौर** आयुक्तांनी लेखी कळविल्यानुसार आयुक्तांचा प्रस्ताव विषय पत्रिकेतून वगळण्यात येतो.

**विषय क्र.५**

नांवामनपाकेच्या नगररचना, पाणी पुरवठा व मलनिस्सारण स्थानिक संस्था कर, व मलेरिया विभागासाठी प्रत्येकी एक जीपची आवश्यकता आहे. या विभागांना नविन जीप दिल्यास त्या त्या विभागाचे कामात सुरळीतता येईल. मे.टाटा मोटर्स लि.यांचे दर करारावर सदरच्या चारही टाटा सुमो गौल्ड बिएस ४ जीप खरेदी करावयाच्या आहेत.एका जीपची किमत रु.५,२६,०४१/-एवढी आहे. चार जीप खरेदीसाठी रु.२१,०४,१६४/- एवढी लागणार आहे. या रक्कमेच्या ९० टक्के रक्कम बॉम्बे मर्कन्टाइल को.ऑप.बॅक लि.नांदेड हे देण्यास तयार आहे. पाच वर्षाकरीता कर्ज घेतल्यास प्रतिमहिणा रु.४३,९६४/- असा हप्ता येईल.

करीता मनपाची १० टक्के रक्कम भरणा करुन वरील प्रमाणे बॅकेकडून ९० टक्के कर्ज घेण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस्तव.

**महापौर** आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. ६** **ठराव**

नांवामनपाकेच्या नगररचना, पाणी पुरवठा व मलनिस्सारण स्थानिक संस्था कर, व मलेरिया विभागासाठी प्रत्येकी एक जीपची आवश्यकता आहे. या विभागांना नविन जीप दिल्यास त्या त्या विभागाचे कामात सुरळीतता येईल. मे.टाटा मोटर्स लि.यांचे दर करारावर सदरच्या चारही टाटा सुमो गौल्ड बिएस ४ जीप खरेदी करावयाच्या आहेत.एका जीपची किमत रु.५,२६,०४१/-एवढी आहे. चार जीप खरेदीसाठी रु.२१,०४,१६४/- एवढी लागणार आहे. या रक्कमेच्या ९० टक्के रक्कम बॉम्बे मर्कन्टाइल को.ऑप.बॅक लि.नांदेड हे देण्यास तयार आहे. पाच वर्षाकरीता कर्ज घेतल्यास प्रतिमहिणा रु.४३,९६४/- असा हप्ता येईल.

करीता मनपाची १० टक्के रक्कम भरणा करुन वरील प्रमाणे बॅकेकडून ९० टक्के कर्ज घेण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.६**

नांवामनपा हध्दीत प्रभाग क्र.२३ अ मधील विविध भागात भूमिगत गटार लाईन टाकणेकरीता प्रस्तूत कामाचे उपअभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन सालसन २०१३-२०१४ च्या म.जी.प्रा.च्या जिल्हा दर सुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक रु.२५,००,०००/-चे तयार करुन सादर केले आहे. प्रस्तूत प्रकरणी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.८३ दि.१४.८.२०१४ अन्वये शक्तीनगर भागात दलित वस्ती मध्ये समाविष्ट असल्याने सि.सि.रोड/सभागृह/नालीचे काम प्रस्तावित केलेले आहे. सदर भागात मलनिस्सारण व्यवस्था करणे महत्वाचे असल्याने सदर काम प्रथम प्राधान्याने घेणे आवश्यक असून लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**सरजितसिंघ गिल** अबचलनगर भागात मलनिस्सारण लाईन टाकण्याचे काम अधुरे आहेत. या भागात रस्त्याचे काम करीत असल्यामूळे रस्त्याचे काम करण्यापुर्वी तेथे मलनिस्सारण लाईन टाकणे आवश्यक आहे. करीता आयुक्तांनी प्रस्तावित केल्यानुसार दलित वस्तु सुधार योजने अंतर्गत मलनिस्सारण लाईन टाकण्यात यावी त्यानंतर रस्त्याचे काम करण्यात यावे.

**नवल पोकर्णा** प्रभाग क्र.११ व १२ मधील खोब्रागडे नगर भागात ड्रेनेज लाईनची समस्या आहेत त्यामूळे प्रभागात ड्रेनेजची समस्या आहेत त्या सर्व भागातील ड्रेनेज लाईनची कामे प्राधान्याने करण्यात यावी.

**आयुक्त** शहरातील सर्व दलित वस्तीचा सर्व्हे करुन दलित वस्ती सुधारण कार्यक्रमा अंतर्गत त्या भागातील विविध विकासाची कामे करण्यासाठी सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरीता १०० कोटीचे अनुदान मंजुर करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

**स.शेर अली** जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत नविन मलनिस्सरण लाईन टाकून त्यावर बांधण्यात आलेले नविन चेंबर दगड,मातीने गाळाने भरलेले असल्यामूळै मलनिस्सारण लाईन चोकअप होवून घाण पाणी रस्त्यावरुन वाहत आहेत त्यामूळै सर्व ड्रेनेज लाईन चेंबरमधील गाळ काढण्यात यावा

**विनय गुर्रम** श्री स.शेर अली यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो बरोबर आहे माझ्याही वार्डातील चेंबर बंद होवून ड्रेनेजचे घाणा पाणी नागरीकांच्या घरात जात आहे. त्यामूळै चेंबरमधील गाळ काढून लाईन प्रवाहित कराव्यात.

**महापौर** दलित वस्ती सुधार योजने अतर्गत प्रस्तावित कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.७** **ठराव**

नांवामनपा हध्दीत प्रभाग क्र.२३ अ मधील विविध भागात भूमिगत गटार लाईन टाकणेकरीता प्रस्तूत कामाचे उपअभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन सालसन २०१३-२०१४ च्या म.जी.प्रा.च्या जिल्हा दर सुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक रु.२५,००,०००/-चे तयार करुन सादर केले आहे. प्रस्तूत प्रकरणी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.८३ दि.१४.८.२०१४ अन्वये शक्तीनगर भागात दलित वस्ती

मध्ये समाविष्ट असल्याने सि.सि.रोड/सभागृह/नालीचे काम प्रस्तावित केलेले असून सि.सि.रोडचे काम होण्यापुर्वी त्या ठिकाणी मलनिस्सारण व्यवस्था करणे महत्वाचे असल्याने दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीतून प्रथम प्राधान्याने प्रभाग क्र.२३ अ मधील विविध भागात भूमिगत गटार लाईन टाकणे करीता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु.२५,००,०००/- ला प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**पुरवणी विषय पत्रिका**

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | मार्च | १०३३ | ९७७ | २०९० | ९४५.७८ |
| २ | एप्रिल | १४७२ | १३२२ | २७९४ | ८९८.०९ |
| ३ | मे | ८६० | ८१६ | १६७६ | ९४८.८३ दि. २८.५.९५ पर्यंत |

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र.८** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुते घेते.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | मार्च | १०३३ | ९७७ | २०९० | ९४५.७८ |
| २ | एप्रिल | १४७२ | १३२२ | २७९४ | ८९८.०९ |
| ३ | मे | ८६० | ८१६ | १६७६ | ९४८.८३ दि. २८.५.९५ पर्यंत |

**विषय क्र.२**

कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे न्यायालयीन प्रकरण पत्र क्र.संकिर्ण २०१५/प्रक्र- १११/नवि-२० दि.५ मे २०१५ प्रमाणे जैविक विविधता व्यवस्थापन समिती एका महिण्याच्या आंत स्थापन करणे अनिवार्य आहे. **महानगरपालिका स्तरावरील जैविक विविधता व्यवस्थापन समिती**

(महाराष्ट्र जैविक विविधता अधिनियम २००८ चे कलम २३(२),(३) व ४ नुसार )

समिती सदस्य म्हणून महानगरपालिकेत निवडून आलेल्या सदस्यामधून महापौरांनी निर्देशित केलेले (६) सदस्य असावेत. (या ६ सदस्यात १/३ महिला सदस्य बंधनकारक आहेत.तसेच या (६) सदस्यांमध्ये अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या प्रतिनिधीचे प्रमाण हे महानगरपालिकेच्या एकूण लोकसंख्याच्या त्या त्या जातीचे प्रमाणात असावेत. सदर समितीचा अध्यक्ष या (६) सदस्यांमधून महापौरानीच निवडावयाचा आहे. )

७) सदस्य सचिव - महानगरपालिका आयुक्त

**स्थानिक स्तरावरील विविध क्षेत्रातील तज्ञ** - सदस्य

८) वनस्पती शास्त्रज्ञ प्रतिनिधी - सदस्य

९) कृषि शास्त्रज्ञ प्रतिनिधी - सदस्य

१०) अकाष्ट वनोपज संकलन करणा-या किंवा वापर करणा-यांचा प्रतिनिधी - सदस्य

११) मच्छीमार करणा-यांचा प्रतिनिधी - सदस्य

१२) जैविक विविधतेचा उपयोग करणा-या संस्थेंचा प्रतिनिधी - सदस्य

१३) लोकसमुह कार्यकर्ता प्रतिनिधी - सदस्य

१४) ज्ञानार्जन(शिक्षण) क्षेत्रातील प्रतिनिधी - सदस्य

**निमंत्रित सदस्य**

१५) वन विभाग स्थानिक अधिकारी - सदसय

१६) कृषिविभागा (जलसंधारण) स्थानिक अधिकारी - सदस्य

१७) पशु संवर्धन विभाग स्थानिक अधिकारी - सदस्य

१८) आरोग्य विभाग स्थानिक प्रतिनिधी - सदस्य

१९) मत्स्य व्यवसाय विभाग स्थानिक प्रतिनिधी - सदस्य
२०) शिक्षण विभाग स्थानिक अधिकारी - सदस्य
२१) आदिवासी विकास विभाग स्थानिक अधिकारी - सदस्य

**विशेष निमंत्रीत सदस्य**

२२) लोकसभेचे विद्यमान सदस्य ( नांदेड)
२३) विधान सभेचे सदस्य नांदेड ( उत्तर)
२४) विधान सभेचे सदस्य नांदेड ( दक्षिण)

उपरोक्त प्रकरणी शासनाच्या निर्णयास अनुसरुन जैविक विविधता व्यवस्थापन समिती एका महिण्याचे आत गठित करणे अनिवार्य असल्यामूळे सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**महापौर** कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे न्यायालयीन प्रकरण पत्र क्र.संकिर्ण २०१५/प्रक्र-१११/नवि-२० दि.५ मे २०१५ प्रमाणे जैविक विविधता व्यवस्थापन समिती एका महिण्याच्या आंत गठित करण्यासाठी कळविलेले असून शासन निर्णयातील तरतूदीनूसार यासमितीवर (६) सदस्य निवडीचे व या समितीचे अध्यक्ष निवडीचे संपुर्ण अधिकार महापौरांना दिलेले असल्यामूळे शासन निर्णयातील तरतूदीनूसार समितीचे सदस्य व अध्यक्ष निवडण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात येईल. या ठरावास याच सभेत कायम करण्यात येते.

**ठराव क्र.९** **ठराव**

कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी न्यायालयीन प्रकरण पत्र क्र.संकिर्ण २०१५/प्रक्र- १११/नवि-२० दि.५ मे २०१५ प्रमाणे महाराष्ट्र जैविक विविधता अधिनियम २००८ चे कलम २३(२),(३) व ४ नुसार महानगरपालिका स्तरावरील खालील प्रमाणे जैविक विविधता व्यवस्थापन विविधता व्यवस्थापन समितीची एका महिण्याच्या आंत स्थापन करण्यासाठी कळविलेले असून या समितीवर महानगरपालिकेत निवडून आलेल्या सदस्यामधून (६) सदस्य निवड करण्याचे व या समितीचे अध्यक्ष म्हणून (६) सदस्यांमधून निवड करण्याचे अधिकार महापौराना दिलेले असल्यामूळे कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई याचे पत्रकानुसार व महाराष्ट्र जैविक विविधता अधिनियम २००८ चे कलम २३(२),(३) व ४ प्रमाणे महापौरांनी खालील प्रमाणे समिती गठित करावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

७) सदस्य सचिव - महानगरपालिका आयुक्त
**स्थानिक स्तरावरील विविध क्षेत्रातील तज्ञ** - सदस्य
८) वनस्पती शास्त्रज्ञ प्रतिनिधी - सदस्य
९) कृषि शास्त्रज्ञ प्रतिनिधी - सदस्य
१०) अकाष्ट वनोपज संकलन करणा-या किंवा वापर करणा-यांचा प्रतिनिधी - सदस्य
११) मच्छीमार करणा-यांचा प्रतिनिधी - सदस्य
१२) जैविक विविधतेचा उपयोग करणा-या संस्थेंचा प्रतिनिधी - सदस्य
१३) लोकसमुह कार्यकर्ता प्रतिनिधी - सदस्य
१४) ज्ञानार्जन(शिक्षण) क्षेत्रातील प्रतिनिधी - सदस्य

**निमंत्रित सदस्य**

१५) वन विभाग स्थानिक अधिकारी - सदसय
१६) कृषिविभागा (जलसंधारण) स्थानिक अधिकारी - सदस्य
१७) पशु संवर्धन विभाग स्थानिक अधिकारी - सदस्य
१८) आरोग्य विभाग स्थानिक प्रतिनिधी - सदस्य
१९) मत्स्य व्यवसाय विभाग स्थानिक प्रतिनिधी - सदस्य
२०) शिक्षण विभाग स्थानिक अधिकारी - सदस्य
२१) आदिवासी विकास विभाग स्थानिक अधिकारी - सदस्य

**विशेष निमंत्रीत सदस्य**

२२) लोकसभेचे विद्यमान सदस्य ( नांदेड)
२३) विधान सभेचे सदस्य नांदेड ( उत्तर)
२४) विधान सभेचे सदस्य नांदेड ( दक्षिण)

**विषय क्र.३**

**आर्थीक परीस्थीती अहवाल सालसन 2015-16** मागील पाच वर्षाचे महसुली जमा व खर्चाचे विवरण **:-**

| वर्ष | महसुली उत्पन्न | महसुली खर्च | तुट (-) |
|---|---|---|---|
| 2011-12 | 95.94 | 135.12 | (-) 39.18 |
| 2012-13 | 105.92 | 130.45 | (-) 24.53 |
| 2013-14 | 132.29 | 142.64 | (-) 10.35 |
| 2014-15 | 124.20 | 124.05 | (+) 0.15 |
| 2015-16 (अपेक्षीत) | 192.91 | 244.84 | (-) 51.93 |

ब) मागील पाच वर्षांचे भांडवली जमा व खर्चाचे विवरण :-

| वर्ष | महसुली उत्पन्न | महसुली खर्च | तुट / शिल्लक |
|---|---|---|---|
| 2011-12 | 364.37 | 322.29 | 42.08 |
| 2012-13 | 357.53 | 226.74 | 130.79 |
| 2013-14 | 116.94 | 125.42 | (-) 8.48 |
| 2014-15 | 136.83 | 108.41 | 28.42 |
| 2015-16 (अपेक्षीत) | 332.19 | 338.39 | (-) 6.20 |

उपरोक्त विवरण **अ** प्रमाणे मनपाचे महसुली उत्पन्न हे प्रतिवर्षी सातत्याने खर्चाच्या तुलनेत कमी होत असल्यामुळे मागील पाच वर्षापासुन प्रत्यक्ष खर्चात सतत तुट निर्माण होत आहे. ज्यामुळे मनपाला अत्यावश्यक खर्च करतांना देखील तारेवरची कसरत करावी लागत आहे. प्रामुख्याने मनपाचे अत्यावश्यक खर्चाचे विवरण खालील प्रमाणे आहे.

**सालसन 2015-16 या आर्थीक वर्षासाठी खालील प्रमाणे आवश्यक आहे.**

| अ.क्र. | अत्यावश्यक खर्च | २०१५-१६ (रु. कोटी मध्ये) |
|---|---|---|
| १ | इंधन व वाहन भाडे | 02.40 |
| २ | निवृत्ती वेतन, निवृत्ती उपदान | 13.20 |
| ३ | पा. पु. देखभाल गुत्तेदार | 03.00 |
| ४ | विद्युत देखभाल ठेकेदार मार्फत | 00.96 |
| ५ | विद्युत बिल (रस्ता दिवाबत्ती, पाणी पुरवठा, इमारत, उद्यान व इतर) | 12.00 |
| ६ | सार्वजनिक बांधकाम देखभाल दुरुस्ती | 04.80 |
| ७ | साफसफाई गुत्तेदार | 10.80 |
| ८ | स्टेशनरी किरकोळ | 01.20 |
| ९ | PMDO कर्ज परतफेड | 21.60 |
| १० | दैनंदिन कार्यालयीन साफसफाई | 00.20 |
| ११ | नगरसेवक मानधन, कर्मचारी वेतन ,मानधन इत्यादी | 69.60 |
| १२ | इमारत भाडे, व इतर खर्च (उदा. जाहीरात, प्रवासभत्ता, आकस्मीक) | 03.00 |
| १३ | इतर योजनेनुसार सहभाग | 09.60 |
| | **एकुण रक्कम (वार्षीक)** | **152.36** |

उपरोक्त प्रमाणे मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत सिमीत असल्याने तसेच अत्यावश्यक खर्च भागवतांना शहरातील विकास कामांसाठी निधी अपुरा पडत असल्यामुळे काही घेतलेल्या विकास कामांतुन तसेच अत्यावश्यक सेवा पुरवितांना करण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमधुन मनपावर मोठया रक्कमेचे दायीत्व निर्माण झाले आहे. आजतागायत मनपाचे दायीत्वाचे विवरण खालील प्रमाणे आहे.

**मनपाचे दायीत्व :** **लेखा विभागा अंतर्गत दायीत्वाचे विवरण –**

| | शिर्षक | रक्कम (कोटी मध्ये) |
|---|---|---|
| १ | कंत्राटदार यांनी केलेले विकास कामांचे थकीत देयके (Work Bill) | 17.59 |
| २ | कंत्राटदार पुरवठाधारक यांनी केलेल्या कामांचे देयके (C Bill) | 14.85 |
| ३ | निवृत्ती वेतन, अंशदान, अंशराशीकरणाच्या थकीत रक्कमा | 03.65 |
| ४ | कंत्राटदारांच्या सुरक्षा अनामत रक्कमेतुन खर्चीत रक्कमा<br>(JNNURM / वेतन / PMPO कर्ज परतफेड इ. साठी) | 27.00 |
| ५ | सिडको मोंढा विकास योजनेतून खर्च<br>(JNNURM / म्हाडा कॉलनी, कौठा रोड व जुना कौठा रोड साठी) | 6.18 |
| ६ | नगरोत्थान मनपा सहभागाची रक्कम | 19.36 |
| ७ | BSUP योजनेसाठी मनपा सहभागाची रक्कम | 30.00 |

| | | |
|---|---|---|
| ८ | मराठवाडा पॅकेज योजनेमध्ये मनपा सहभाग | 00.55 |
| ९ | PMDO कर्ज | 69.55 |
| १० | आयुर्विमा व MJP कर्ज | 07.00 |
| | **एकुण (आकडे कोटीत)** | **195.73** |

**इतर विभागा अंतर्गत दायीत्वाचे विवरण –**

| | **शिर्षक** | **रक्कम (कोटी मध्ये)** |
|---|---|---|
| १ | सार्वजनीक बांधकाम विभाग पुर्न:प्रशासकीय | 27.67 |
| २ | सार्वजनीक बांधकाम विभाग प्रशासकीय | 01.28 |
| ३ | पाणी पुरवठा विभाग पुर्न:प्रशासकीय | 02.69 |
| ४ | पाणी पुरवठा विभाग प्रशासकीय | 00.22 |
| ५ | मल:निस्सारण पुर्न:प्रशासकीय | 3.69 |
| ६ | मल:निस्सारण प्रशासकीय | 00.07 |
| ७ | विद्युत विभाग प्रशासकीय | 00.38 |
| | **एकुण (आकडे कोटीत)** | **36.00** |

मनपाचे आजतागायत एकुण दायीत्व :- रुपये - 229.23 कोटी असुन त्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. तसेच दिनांक 01 ऑगस्ट 2015 पासुन महाराष्ट्र शासनाने मनपाचे मुख्य उत्पन्नाचे साधन असलेले स्थानीक संस्था कर (LBT) बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. तरी मनपास अति आवश्यक खर्च भागविण्यासाठी उत्पन्नाचे नविन स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे.

**महापौर** आयुक्तांनी सादर केलेल्या उत्पन्न व खर्चाची नोंद घेण्यात येते.तसेच महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी व महानगरपालिकेचा अति आवश्यक खर्च भागविण्यासाठी उत्पन्नाचे नविन स्त्रोत कसे वाढविता येईल याबाबतचे प्रस्ताव आयुक्तांनीच सर्वसाधारण सभेत द्यावे त्यावर सर्वसाधारण सभा निर्णय घेईल.

**ठराव क्र. १०** **ठराव**

आयुक्त, नांवामनपा नांदेड यांनी खालील प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे अत्यावश्यक खर्चाचे व दायीत्वाचे विवरण दिलेल असून त्याची नोंद हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**सालसन 2015-16 या आर्थीक वर्षासाठी खालील प्रमाणे आवश्यक आहे.**

| **अ.क्र.** | **अत्यावश्यक खर्च** | **२०१५-१६ (रु. कोटी मध्ये)** |
|---|---|---|
| १ | इंधन व वाहन भाडे | 02.40 |
| २ | निवृत्ती वेतन, निवृत्ती उपदान | 13.20 |
| ३ | पा. पु. देखभाल गुत्तेदार | 03.00 |
| ४ | विद्युत देखभाल ठेकेदार मार्फत | 00.96 |
| ५ | विद्युत बिल (रस्ता दिवाबत्ती, पाणी पुरवठा, इमारत, उद्यान व इतर) | 12.00 |
| ६ | सार्वजनिक बांधकाम देखभाल दुरुस्ती | 04.80 |
| ७ | साफसफाई गुत्तेदार | 10.80 |
| ८ | स्टेशनरी किरकोळ | 01.20 |
| ९ | PMDO कर्ज परतफेड | 21.60 |
| १० | दैनंदिन कार्यालयीन साफसफाई | 00.20 |
| ११ | नगरसेवक मानधन, कर्मचारी वेतन ,मानधन इत्यादी | 69.60 |
| १२ | इमारत भाडे, व इतर खर्च (उदा. जाहीरात, प्रवासभत्ता, आकस्मीक) | 03.00 |
| १३ | इतर योजनेनुसार सहभाग | 09.60 |
| | **एकुण रक्कम (वार्षीक)** | **152.36** |

उपरोक्त प्रमाणे मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत सिमीत असल्याने तसेच अत्यावश्यक खर्च भागवतांना शहरातील विकास कामांसाठी निधी अपुरा पडत असल्यामुळे काही घेतलेल्या विकास कामांतुन तसेच अत्यावश्यक सेवा पुरवितांना करण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमधुन मनपावर मोठया रक्कमेचे दायीत्व निर्माण झाले आहे. आजतागायत मनपाचे दायीत्वाचे विवरण खालील प्रमाणे आहे.

**मनपाचे दायीत्च :** **लेखा विभागा अंतर्गत दायीत्वाचे विवरण –**

| | **शिर्षक** | **रक्कम (कोटी मध्ये)** |
|---|---|---|
| १ | कंत्राटदार यांनी केलेले विकास कामांचे थकीत देयके (Work Bill) | 17.59 |

| | | |
|---|---|---|
| २ | कंत्राटदार पुरवठाधारक यांनी केलेल्या कामांचे देयके (C Bill) | 14.85 |
| ३ | निवृत्ती वेतन, अंशदान, अंशराशीकरणाच्या थकीत रक्कमा | 03.65 |
| ४ | कंत्राटदारांच्या सुरक्षा अनामत रक्कमेतुन खर्चीत रक्कमा (JNNURM / वेतन / PMPO कर्ज परतफेड इ. साठी) | 27.00 |
| ५ | सिडको मोंढा विकास योजनेतून खर्च (JNNURM / म्हाडा कॉलनी, कौठा रोड व जुना कौठा रोड साठी) | 6.18 |
| ६ | नगरोत्थान मनपा सहभागाची रक्कम | 19.36 |
| ७ | BSUP योजनेसाठी मनपा सहभागाची रक्कम | 30.00 |
| ८ | मराठवाडा पॅकेज योजनेमध्ये मनपा सहभाग | 00.55 |
| ९ | PMDO कर्ज | 69.55 |
| १० | आयुर्विमा व MJP कर्ज | 07.00 |
| | **एकुण (आकडे कोटीत)** | **195.73** |

**इतर विभागा अंतर्गत दायीत्वाचे विवरण –**

| | **शिर्षक** | **रक्कम (कोटी मध्ये)** |
|---|---|---|
| १ | सार्वजनीक बांधकाम विभाग पुर्न:प्रशासकीय | 27.67 |
| २ | सार्वजनीक बांधकाम विभाग प्रशासकीय | 01.28 |
| ३ | पाणी पुरवठा विभाग पुर्न:प्रशासकीय | 02.69 |
| ४ | पाणी पुरवठा विभाग प्रशासकीय | 00.22 |
| ५ | मल:निस्सारण पुर्न:प्रशासकीय | 3.69 |
| ६ | मल:निस्सारण प्रशासकीय | 00.07 |
| ७ | विद्युत विभाग प्रशासकीय | 00.38 |
| | **एकुण (आकडे कोटीत)** | **36.00** |

<u>मनपाचे आजतागायत एकुण दायीत्व :-</u> रुपये - 229.23 कोटी असुन त्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. तसेच दिनांक 01 ऑगस्ट 2015 पासुन महाराष्ट्र शासनाने मनपाचे मुख्य उत्पन्नाचे साधन असलेले स्थानीक संस्था कर (LBT) बंद करण्याचा निर्णय घेतलेला असल्यामूळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी व महानगरपालिकेचा अति आवश्यक खर्च भागविण्यासाठी उत्पन्नाचे नविन स्त्रोत कसे वाढविता येईल याबाबतचा प्रस्ताव आयुक्तांनीच सर्वसाधारण सभेस सादर करावा असेही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र.४** **प्रस्ताव**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून महानगरपालिकेतर्फे विशेष कार्यक्रमाचे नियोजन करणे बाबत.

सुचकः- विरेंद्रसिंध गाडीवाले अनुमोदकः-डॉ.करुणा जमदाडे

**महापौर** अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आल्याप्रमाणे आयुक्तानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून महानगरपालिकेतर्फे विशेष कार्यक्रमाचे नियोजन करुन कार्यकम घेण्यात यावे या कार्यकमासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्याचे अधिकारही आयुक्त,नांवामनपा नांदेड यांना देण्यात येतो.

**ठराव क्र. ११** **ठराव**

सालसन २०१५-२०१६ च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आल्याप्रमाणे आयुक्तानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून महानगरपालिकेतर्फे विशेष कार्यक्रमाचे नियोजन करुन कार्यकम घेण्यात यावे,व या कार्यकमासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्याचे अधिकारही आयुक्त,नांवामनपा नांदेड यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**विषय क्र.५** **प्रस्ताव**

नांवामनपा हध्दीतील अबचलनगर कॉलनीत संपादित केलेल्या जागेच्या ठिकाणी लागू असलेल्या विकास नियंत्रक नियमावली प्रमाणे एफ.एस.आय.मंजुर करुन बांधकाम परवानगी देणे बाबत.

**सुचकः**- विरेंद्रसिंध गाडीवाले **अनुमोदकः**- सरजितसिंघ गिल, अ.सत्तार अ.गफुर

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

नांवामनपा हध्दीतील अबचलनगर स.नं.९४,९५ येथे गुरु ता गध्दी त्रिशताब्दी सोहळा २००८ अंतर्गत गुरुव्दारा परिसर विकासामध्ये बांधीत झालेल्या मालमत्ता धारकांचे पुर्नवसन करण्यात आले असून नांदेड शहराच्या मंजुर सुधारीत विकास योजने प्रमाणे आरक्षण क्र. एफ-१८, गुरुव्दारा रिडेव्हलपमेंट स्कीमसाठी आरक्षित आहे.

पुर्नवसीत नागरीकांच्या मुळ मिळकती हया गुरुव्दारा परिसरातील होत्या व सदर भाग हा दाटवस्ती/गावठाण मध्ये समाविष्ट असून याविकास नियंत्रण नियमावली प्रमाणे त्यांना चटई क्षेत्र निर्देशांक १.५ व २.० अनुज्ञेय आहे.

यापूर्वी मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१३१ दि.३१.८.२०१३ अन्वये पुनर्वसन केलेल्या जागेत सध्या विकास नियत्रण नियमावली प्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांक १ अनुज्ञेय असून त्या ठिकाणी चटई क्षेत्र निर्देशांक गावठाण प्रमाणे १.५ व २.० अनुज्ञेय करण्याबाबत ठराव पारीत झालेला आहे. सदरील ठरावाच्या अनुषंगाने नगररचना विभागामार्फत कार्यालयीन पत्र क्र.नरवि/५३७४ दि.१८.६.२०१४ अन्वये शासनास मार्गदर्शन करण्याची विनंती केली असून अद्याप मार्गदर्शन अप्राप्त आहे.

**महापौर** प्रशासकिय टिपपणीनुसार मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.१२** **ठराव**

नांवामनपा हध्दीतील अबचलनगर स.नं.९४,९५ येथे गुरु ता गध्दी त्रिशताब्दी सोहळा २००८ अंतर्गत गुरुव्दारा परिसर विकासामध्ये बांधीत झालेल्या मालमत्ता धारकांचे पुर्नवसन करण्यात आले असून नांदेड शहाराच्या मंजुर सुधारीत विकास योजने प्रमाणे आरक्षण क्र. एफ-१८, गुरुव्दारा रिडेव्हलपमेंट स्कीमसाठी आरक्षित असून या जागेत बांधकामासाठी सध्या विकास नियत्रण नियमावली प्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांक १ अनुज्ञेय असून त्या ठिकाणी चटई क्षेत्र निर्देशांक गावठाण प्रमाणे १.५ व २.० अनुज्ञेय करण्याबाबत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने यापुर्वीच ठराव पारीत केलेला असून सदरील ठरावाच्या अनुषंगाने नगररचना विभागामार्फत कार्यालयीन पत्र क्र.नरवि/५३७४ दि.१८.६.२०१४ अन्वये शासनास मार्गदर्शन करण्याची विनंती केली असून अद्याप मार्गदर्शन अप्राप्त आहे.करीता आयुक्तांनी पुनश्च याप्रकरणात प्रस्ताव सादर करुन त्या ठिकाणी चटई क्षेत्र निर्देशांक गावठाण प्रमाणे १.५ व २.० अनुज्ञेय मंजुर करण्यासाठी शासनास विंनती करण्यात यावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र. ६** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरालिकेतील कार्यरत कर्मचारी श्री गणेश कुमरय्या मुदिराज, स्वच्छता निरिक्षक यांचे वडील कुमरय्या नरसय्या मुदिरराज यांना ब्रेन टयुमर झालेला असून त्यांचे ब्रेन टयुमरच्या ऑपरेशन करणे आवश्यक असल्याचे लिलावती हॉस्पीटल, मुंबई येथील वैद्यकिय अधिका-यांनी यांनी सांगितले असून या ऑपरेशन करीता व औषधोपचारासाठी जवळपास रु. ४-५ लक्ष अपेक्षित आहे. संबंधीत कर्मचा-यांची आर्थीक परिस्थिती अत्यंत बिकट झालेली असल्यामुळे संबंधीत हे येवढा खर्च करु शकत नसल्याने त्यांना नांदेड वाधाळा शहर महानगरपालिके तर्फे आर्थीक मदत म्हणुन रु. ५.०० लक्ष देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही मनपा सर्व साधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते.

**सुचकः-** संजय गंगाधर मोरे **अनुमोदकः-** इतरत फातेमा अ.शमीम

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

नावाशमनपा आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना वैद्यकिय प्रतिपुर्तीच्या लाभ अनुज्ञेय नसल्यामुळे दुर्धर आजाराच्या उपचारासाठी मदतीच्या मागण्या वाढत असल्यामुळे दुर्धर आजाराच्या उपचारासाठी मदतीच्या मागण्या वाढत असल्यामुळे या बाबतीत सर्व समावेशक धोरण ठरवण्यास मनपा सर्व साधारण सभेने ठराव क्रं. १५९ दि. ०९.०१.२०१५ रोजी मान्यता प्रदान केली आहे.

त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागा मार्फत राज्यातील एकूण २२ मनपाकडून वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती बाबत माहिती व नियमावली उपलब्ध करुन देण्यासाठी कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साप्रवि/१९४९४/२०१५ दि. २७.०१.२०१५ अन्वये विनंती करण्यात आली महानगरपालिका कर्मचारी व त्यांच्या जवळच्या नातेवाईकास दुर्धर आजार झाल्यास कर्मचा-याचे मासिक उत्पन्न व झालेला मोठा खर्च विचारात घेता त्यांना आथिक मदत करणे आवश्यक आहे. सध्या दुर्धर आजाराच्या उपचारासाठी वारंवार आर्थिक मदतीच्या मागण्या वाढत असल्यामूळे याबाबतीत सर्वसमावेशक धोरण ठरविण्यासाठी मान्यता सर्वसाधारण सभेने दिली असल्याने वैद्यकिय प्रतिपुर्ती बाबत सर्वसाधारण सभेने ठराव पारीत करुन महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचारी यांना राज्यातील इतर महानगरपालिकेतील तरतुदीचा अभ्यास करुन सर्वकश धोरणाचा नियम व अटीचा सविस्तर प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा अशी मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने ठराव क्र.१५९ दि.९.१.२०१५ अन्वये इतर महानगरपालिकेकडून नियमावली /उपविधी बाबत माहिती मागविण्यात आली असता बृहन्मुंबई, पूणे,पिंपरी चिंचवड,औरंगाबाद,अहमदनगर,कोल्हापुर,सोलापूर,मालेगाव या महानगरपालिकेकडून माहिती प्राप्त झाली आहे.

करीता उपरोक्त प्राप्त माहितीचा अभ्यास करुन त्याच धर्तीवर महानगरपालिकेतील कर्मचा-यांना वैद्यकिय प्रतिपुर्ती चा लाभ देण्यासाठी खालील अधिकारी यांची कार्यालयीन आदेश क्र.. नावाशमनपा/साप्रवि/१५९६/२०१५ दि. ७.०५.२०१५ अन्वये प्र.वैद्यकिय अधिकारी, प्र.मुख्य लेखाधिकारी, अंतर्गत लेखापरिक्षक,सहायक आयुक्त,साप्रवि,विधी अधिकारी यांची एक समिती कायम करण्यात आलेली आहे.

उक्त समितीने इतर महानगरपालिकेतील प्राप्त झालेल्या उपविधीतील तरतूदीचा अभ्यास करुन त्याच धर्तीवर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यांकरीता वैद्यकिय प्रतिपुर्ती बाबतची नियमावली एक महिण्याचे आंत तयार करुन आयुक्त मनपा नांदेड यांच्याकडे सादर करण्यास कळविले आहे. त्यानुसार सदर समितीचे नियमावली तयार केल्याचा अहवाल सध्यस्थितीत अप्राप्त आहे.

करीता नियुक्त करण्यात आलेल्या समितीने अभ्यास करुन अहवाल सादर केल्यानंतर त्या अनुषंगाने वैद्यकिय प्रतिपुर्ती खर्चाची प्रतिपुर्ती देणे बाबत निर्णय घेणे सुलभ होईल

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरालिकेतील कार्यरत कर्मचारी श्री गणेश कुमरय्या मुदिराज, स्वच्छता निरिक्षक यांचे वडील कुमरय्या नरसय्या मुदिरराज यांना ब्रेन टयुमर झालेला असून त्यांचे ब्रेन टयुमरच्या ऑपरेशन करणे आवश्यक असल्याचे लिलावती हॉस्पीटल, मुंबई येथील वैद्यकिय अधिका-यांनी यांनी सांगितले असून या ऑपरेशन करीता व औषधोपचारासाठी जवळपास रु. ४-५ लक्ष अपेक्षित आहे. संबंधीत कर्मचा-यांची आर्थीक परिस्थिती अत्यंत बिकट झालेली असल्यामुळे संबंधीत हे येवढा खर्च करु शकत नसल्याने त्यांना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके तर्फे आर्थीक मदत म्हणुन रु. ५.०० लक्ष देण्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही मनपा सर्व साधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.७** **प्रस्ताव**

लवकरच पावसाळा सुरु होत असून शहरातील मुख्य रस्त्यावर व अंतर्गत रस्त्यावर पाणी पुरवठा व मलनिस्सारण पाईप लाइन टाकण्यासाठी, मोबाइल कैंबल लाईन टाकणेसाठी रस्ते खोदून पाईप लाईन, केबल टाकण्यात आल्या परंतु रस्त्यावर माती, बांधकामाचे साहित्य उचलण्यात आलेले नाहीत तसेच नागीकांनीही आपले बांधकामाचे साहित्य माती,गिटी, मुरुम, रेती मोठया प्रमाणात रस्त्यावर टाकण्यात आल्यामूळे वाहतुकीस अडथळा होत आहे व पावसाळयात असेच रस्त्यावर साहित्य पडून राहिले तर पावसाचे पाणी रस्त्यावर साचुन नागरीकांना येण्यास त्रास होईल अशा बांधकाम साहित्यामूळे यापुर्वी अपघात होवून नागरीकांचा मूत्यू झालेला आहे, तरी पावचसाळा सुरु होण्यापुर्वी शहरातील सर्व नागरीकाना आपले बांधकामाचे साहित्य उचलणेसाठी जाहिर आवाहन करण्यात यावे. जे नागरीक आपले बांधकामाचे मटेरियल उचलणार नाही त्यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही करुन बांधकामाचे मटेरियल जप्त करण्यात यावे. रस्त्यावरील तसेच महानगरपालिकेच्या कंत्राटदारांनाही रस्त्यावरील माती, मुरुम, आदी साहित्य उचण्यासाठी आदेशित करण्यात यावे. असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**सुचकः**- सविता कंठेवाड **अनुमोदकः**- रजिया बेगम अय्युब खॉं

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १४** **ठराव**

लवकरच पावसाळा सुरु होत असून शहरातील मुख्य रस्त्यावर व अंतर्गत रस्त्यावर पाणी पुरवठा व मलनिस्सारण पाईप लाइन टाकण्यासाठी, मोबाइल कैंबल लाईन टाकणेसाठी रस्ते खोदून पाईप लाईन, केबल टाकण्यात आल्या परंतु रस्त्यावर माती, बांधकामाचे साहित्य उचलण्यात आलेले नाहीत तसेच नागीकांनीही आपले बांधकामाचे साहित्य माती,गिटी, मुरुम, रेती मोठया प्रमाणात रस्त्यावर टाकण्यात आल्यामूळे वाहतुकीस अडथळा होत आहे व पावसाळयात असेच रस्त्यावर साहित्य पडून राहिले तर पावसाचे पाणी रस्त्यावर साचुन नागरीकांना येण्यास त्रास होईल अशा बांधकाम साहित्यामूळे यापुर्वी अपघात होवून नागरीकांचा मूत्यू झालेला आहे, तरी पावचसाळा सुरु होण्यापुर्वी शहरातील सर्व नागरीकाना आपले बांधकामाचे साहित्य उचलणेसाठी जाहिर आवाहन करण्यात यावे. जे नागरीक आपले बांधकामाचे मटेरियल उचलणार नाही त्यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही करुन बांधकामाचे मटेरियल जप्त करण्यात यावे. रस्त्यावरील तसेच महानगरपालिकेच्या कंत्राटदारांनाही रस्त्यावरील माती, मुरुम, आदी साहित्य उचण्यासाठी आदेशित करण्यात यावे. असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.८** **प्रस्ताव**

नांवामनपा हृध्दीतील मालमत्ता कर वसुली करत असतांना आगावु कराचा भरणा करणा-या मालमत्ताधारकांना माहे मे ते सप्टेंबर २०१५ पर्यत कराचा पुर्ण भरणा करणारांना सुट देण्यात येत आहे. त्यामध्ये ज्या मालमत्ता महिलांच्या नांवे आहेत त्या मालमत्ता कराच्या १ टक्का वाढीव सुट देण्यात यावी ज्यामूळे शहरातील नागरीकांना मालमत्ता महिलांच्या नांवे करण्यास प्रोत्साहन मिळू शकेल सदरील ठराव याच सभेत मंजुर करुन कायम करण्यात येत आहे.व त्यानुसार अमलबजावणी करण्यात यावी. साहित्य उचण्यासाठी आदेशित करण्यात यावे. असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**सुचकः**- सविता कंठेवाड **अनुमोदकः**- डॉ.शीला कदम

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेच्या रिफार्म नुसार करात नविन सवलत देता येणार नाही असा करार केलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम १४० अ नुसार आगावु कराचा भरणा केला तर सुट देण्यात येत आहे. ज्याकरीता अर्थसंकल्प २०१५-२०१६ ठराव क्र.२५१ दि.३१ मार्च २०१५ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. सदरील कराची सुट कालावधीतच म्हणजे मे ते सप्टेंबर २०१५ याकालावधीत महिलांच्या नावाने असलेल्या एका निवासी इमारतीच्या करात पुर्ण कराचा भरणा केला तर अतिरिक्त १ टक्का वाढीव सुट देण्यात येईल तथापी सदरील प्रकरणी राज्य शासनाची मान्यता अपेक्षित गृहित धरुन याची अमलबजावणी करण्यात येइल यास मंजुरी मिळाली नाही तर तीरक्कम थकबाकी म्हणून त्या त्या मालमत्तेवर मागणी करण्यात येईल.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** आयुक्तांनी मे ते सप्टेंबर २०१५ याकालावधीत महिलांच्या नावाने असलेल्या एका निवासी इमारतीच्या करात पुर्ण कराचा भरणा केला तर अतिरिक्त १ टक्का वाढीव सुट देण्यात येईल तथापी सदरील प्रकरणी राज्य शासनाची मान्यता अपेक्षित गृहित धरुन याची अमलबजावणी करण्यात येइल यास मंजुरी मिळाली नाही तर ती रक्कम थकबाकी म्हणून त्या त्या मालमत्तेवर मागणी करण्यात येईल असा प्रशासकीय अभिप्राय दिलेला आहे. त्यामूळे शासनाने अतिरिक्त १ टक्का वाढीव सुट देण्याचे प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर स.सदस्यांच्या प्रस्तावानुसार महिलांच्या नावांवर असलेल्या मालमत्तांना अतिरिक्त २ टक्का वाढीव सुट देण्याचा विचार करण्यात यावा.

**महापौर** सभागृह नेते श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी मांडलेल्या प्रस्तावानुसार मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१५** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकने सालसन २०१५.२०१६ या आर्थिक वर्षाकरीता मे ते सप्टेंबर २०१५ पर्यत मालमत्ता कराचा भरणा करणा-या मालमत्ताधारकाना १ टक्का सुट देण्याचा निर्णय घेतलेला असून राज्य शासनाची मान्यता अपेक्षित गृहित धरुन याची अमलबजावणी करण्यात येत आहे. यास मंजुरी मिळाली नाही तर तीरक्कम थकबाकी म्हणून त्या त्या मालमत्तेवर मागणी करण्यात येईल.असा अभिप्राय देण्यात आलेला असल्यामूळे मालमत्ताधारकाना अतिरिक्त १ टक्का सुट देण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिल्यानंतर महिलांच्या नावांवर असलेल्या मालमत्तांना अतिरिक्त २ टक्का वाढीव सुट देण्याचा विचार करण्यात यावा असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते समत करते.

<u>विशेष बाब म्हणून आयत्या वेळेस घेण्यात आलेले तातडीचे प्रस्ताव</u>

**विषय क्र.१** **<u>प्रस्ताव</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील पौर्णिमानगर/सुंदरनगर याभागात ब-याच प्रमाणात गोर गरीबांची लोकसंख्या आहे. हा भाग शासकीय रुग्णालय,महिला रुग्णालयापासून मोठया अंतरावर आहे. गोर गरीब जनतेला तातडीची आरोग्य सेवा देणे हे महानगरपालिकेचे प्रथम कर्तव्य असून संबंधित भाग महानगरपालिकेचे आरोग्य सेवा देण्यापासून खुपच लांब असून त्यासाठी त्या भागातील जनतेस विशेष करुन महिला व बालकांना सेवा देणे अत्यंत आवश्यक आहे. सदर भागाला लागून असलेले भाग पौर्णिमानगर ,सुंदरनगर,शोभागनगर,नाईकनगर,गितानगर ई.भागातील लाभांर्थी या दवाखान्याचा लाभ घेवू शकतात.

करीता पौर्णिमानगर /सुंदरनगर याभागात महानगरपालिकातर्फे नविन दवाखाना सुरु करण्यासाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. व पुढील वैधानिक कार्यवाही मा.आयुक्त यांनी करावी.

**सुचक:-** पवळे उमेश देवराव **अनुमोदक:-** विजय हिराचंद येवनकर

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील पौर्णिमानगर/सुंदरनगर याभागात ब-याच प्रमाणात गोर गरीबांची लोकसंख्या आहे. हा भाग शासकीय रुग्णालय,महिला रुग्णालयापासून मोठया अंतरावर आहे. गोर गरीब जनतेला तातडीची आरोग्य सेवा देणे हे महानगरपालिकेचे प्रथम कर्तव्य असून संबंधित भाग महानगरपालिकेचे आरोग्य सेवा देण्यापासून खुपच लांब असून त्यासाठी त्या भागातील जनतेस विशेष करुन महिला व बालकांना सेवा देणे अत्यंत आवश्यक आहे. सदर भागाला लागून असलेले भाग पौर्णिमानगर ,सुंदरनगर,शोभागनगर,नाईकनगर,गितानगर ई.भागातील लाभांर्थी या दवाखान्याचा लाभ घेवू शकतात.

करीता पौर्णिमानगर /सुंदरनगर याभागात महानगरपालिकातर्फे नविन दवाखाना सुरु करण्यासाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. व पुढील वैधानिक कार्यवाही मा.आयुक्त यांनी करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा सपंल्याचे जाहिर करण्यात येते शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड..

**स्वाक्षरीत/-**
**महापौर**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड